नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १८४ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




गुरुवार, दि. ११ जून २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## एनडीएचं सरकार आल्याने १२ वर्षात देशाचं भाग्य बदललं : पंतप्रधान



**मुंबई : (स. गांवकरी)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात एनडीए सरकारची १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. मागील १२ वर्षांच्या कारकिर्दीबाबत नरेंद्र मोदी यांनी भाष्य केलं. देशातले २५ कोटी लोक हे दारिद्र्यरेषेच्या बाहेर आले आहेत ही आशा निओ मिडल क्लासला आणखी धीर देणारी ठरली आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. तसंच एनडीएच्या नेतृत्वात जी १२ वर्षे देशाने पाहिली त्यामुळे देशाचं भाग्य बदललं असंही नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

भारतमातेची सेवा करण्याची संधी इतका दीर्घकाळ मला मिळाली हे मी माझं सौभाग्य समजतो. ईश्वराच्या कृपेनेच हे शक्य झालं असं मला वाटतं. मी कायमच देशाच्या सेवेकडे अध्यात्मिक साधना म्हणून पाहिलं आहे. तसंच ही साधना माझ्या एकट्याची नाही तर हा सामूहिक सेवेचा यज्ञ आहे असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. तुम्ही सगळ्याच सहकाऱ्यांनी या यज्ञात आपलं योगदान दिलं आहे असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.

२०१४ च्या आधीची जी दशकं होती त्यामध्ये देशात अनेकदा अस्थिरता होती. आता लोक एक स्थिर सरकार मागील बारा वर्षांमध्ये पाहात आहेत. २०१४ मध्ये मी म्हटलं होतं की आम्ही सामान्य माणसासाठी आशेचा किरण घेऊन आलो आहोत आणि ही जबाबदारी कायम ठेवणं ही आपली सगळ्यांची सामूहिक जबाबदारी आहे. एनडीएचं सरकार देशात आल्याने देशाचं भाग्य बदललं असं मला वाटतं असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्या भाषणात म्हटलं आहे.

मागील १२ वर्षांच्या राजकीय प्रवासात मी अनेक उतार-चढाव पाहिले. मी हा विचारही कधी केला नव्हता की मी दीर्घकाळ मी पंतप्रधान पदावर राहिन आणि देशाची सेवा करेन.

मला ही संधी मिळाली हे मी माझं भाग्य समजतो. मला तुम्ही सगळ्यांनी पंतप्रधान म्हणून निवडलंत यासाठी मी तुम्हा सगळ्यांचा आणि देशाच्या जनतेचा आभारी आहे. मला भारतमातेची सेवा करण्याची संधी ही दीर्घकाळ लाभली आहे. जनता जनार्दन रुपी ईश्वराचा हा आशीर्वाद आहे असंच मी समजतो असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

आपल्या भाषणात नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की मागील १२ वर्षांमध्ये एऩडीएने स्थिर सरकार दिलं आहे. या सरकारने सगळ्याच क्षेत्रांमध्ये प्रगती केली आहे. आपला देश विकसित भारतच्या व्हिजनसाठी जोशाने आणि अत्यंत उत्साहाने काम करतो आहे याचा मला खूप आनंद आणि समाधान आहे असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

### काँग्रेसच्या कु-चक्रातून देश स्वतंत्र झाला : मोदी

देश काँग्रेसच्या कु-चक्रातून स्वतंत्र झालेला आहे. काँग्रेसने देशाला लाचारी, हीन भावनेत ढकलून दिलं होतं. भारतात विकास हळूहळूच होतो, असं वारंवार सांगितलं जात होतं. भारतात गतीने विकास करणे शक्यच नाही, असे काँग्रेसकडून भासवले जात होते. या हळूहळू विकासाला हिंदू ग्रोथ रेट असे नाव दिले होते. ही कार्यशैली काँग्रेसची होती, अपयश काँग्रेसचे होते, जबादारी काँग्रेसची होते. परंतु कलंक मात्र देशातील हिंदू लोकसंख्येवर लावलण्यात आला अशी टीका मोदी यांनी त्यांच्या भाषणातत केली. काँग्रेस सत्तेत असताना सरकार नव्हते, नीती नव्हती, विचार नव्हता. अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्त्वात पहिल्यांदाच एनडीए सरकार आले. एनडीएचे सरकार पहिल्यांदा आल्यानंतर विकासात गती कशी येते, हे आपल्याला पाहायला मिळाले. परंतु दुर्दैवाने २००४ साली देश पुन्हा अस्थिरतेच्या वादळात आणि काँग्रेसच्या सत्तेत फसून गेला. काँग्रेस पुन्हा सत्तेत आल्यानंतर देशाला हजारो, कोटी रुपयांच्या घोटाळ्यात ढकलून दिले असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलंय.

## थोडक्यात...

### सिकंदर शेख याच्या गाडीचा अपघात

मुंबई (स. गांवकरी) : महाराष्ट्रातील प्रसिद्ध पैलवान सिकंदर शेख याच्या गाडीचा अपघात झाल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. कवठेमंकाळ तालुक्यातील विठ्ठलवाडी जवळ त्याच्या ‘थार’गाडीचा अपघात झाला. रत्नागिरी नागपूर हायवे वर विठ्ठलवाडी येथे कारने साईड डिव्हायडरला धडक दिली होती. सिकंदरचा अपघात झाला तेव्हा तो गाडीत होता का? अपघात नेमका कशामुळे झाला? सिकंदर जखमी आहे का? असे अनेक प्रश्न सर्वांना पडलेत. याबाबत कुस्तीसम्राट म्हणून ओळखले जाणारे वस्ताद अस्लम काझी यांनी महत्वाची माहिती दिली आहे. सिंकदर गाडीत होता. पण सिकंदरला सुदैवाने काही लागले नसल्याची माहिती अस्लम काझी यांनी दिली आहे.

### शाळा ३० जून रोजीच सुरु होणार

मुंबई (स. गांवकरी) : मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शिक्षण विभागाचा यापूर्वीचा 28 मार्च आणि 9 जून चा आदेश रद्द केला आहे. त्यामुळं आता विदर्भातील शाळा 30 जून रोजीच सुरु होणार आहेत. शिक्षण विभागाने 28 मार्च रोजी आदेश काढत महाराष्ट्रातील विदर्भासह सर्व शाळा 15 जून रोजी सुरु होतील असे निर्देश दिले होते. त्यासंदर्भात विदर्भातील शिक्षक संघटना आणि पालकांनी 15 जून रोजी तापमान म्हणावं तेवढं कमी होत नाही अशी ओरड केली होती. आधीपासूनच विदर्भातील शाळांसाठी 26 जून ची तारीख निश्चित असल्यामुळे शिक्षण विभागाच्या 28 मार्च चे आदेशाला विरोध दर्शविला होता. यासंदर्भात काही संघटना मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठातही गेल्या होत्या.

### काश्मीरमध्ये दुर्घटना

मुंबई (स. गांवकरी) : पाकव्याप्त काश्मीरमध्ये मोठी दुर्घटना झाल्याची बातमी समोर येत आहे. पाकव्याप्त मुझफ्फराबादमध्ये पाकिस्तानच्या लष्कराचे एमआय-17 हेलिकॉप्टर कोसळल्याची घटना घडली आहे. हेलिकॉप्टरमधील सर्वच प्रवाशांचा मृत्यू झाला आहे. बचाव पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत. मृतांचा नेमका आकडा अद्याप जाहीर करण्यात आलेला नाही. उड्डाण करताना हेलिकॉप्टर कोसळल्याची माहिती मिळाली आहे. हेलिकॉप्टरमध्ये वैमानिकासह 20 सैनिक असल्याची माहिती मिळत आहे.

## दादर बेस्ट बस अपघात चालकाच्या निष्काळजीपणामुळेच

### गाडीचे ब्रेक सुस्थितीत- चालकाचा दावा आरटीओने फेटाळला

- बेस्ट प्रशासनाकडून चार सदस्यीय समिती गठीत, चालकाचा परवाना रद्द करण्याची शक्यता



**मुंबई : (स. गांवकरी)**

दादर प्लाझा येथील वीर कोतवाल उद्यानाजवळ सोमवारी सकाळी झालेला अपघात हा बसचा ब्रेक निकामी झाल्याने घडल्याचा दावा चालकाने केला होता. मात्र ताडदेव आरटीओच्या प्रथमदर्शनी अहवालात बसचे ब्रेक सुस्थितीत असल्याचे नमूद केले आहे. बसचा अपघात चालकाच्या निष्काळजीमुळेच झाला असला असून पोलिसांच्या शिफारसीनंतर चालकाचा परवाना (लायसन्स) रद्द करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. बेस्टच्या ताफ्यातील ओलेक्ट्रा कंपनीच्या बसचा सोमवारी सकाळी साडे नऊ वाजण्याच्या सुमारास वीर कोतवाल उद्यानाजवळ अपघात झाला होता. या अपघातात एका दुचाकी चालकाचा मृत्यू झाला तर सहा जण जखमी झाले आहेत. अपघातावेळी बसचे ब्रेक निकामी झाल्याचा जबाब चालकाने दिला आहे. मात्र बसची तपासणी केली असता बसचे ब्रेक सुस्थितीत असल्याचे आरटीओने आपल्या अहवालात म्हटले आहे. आरटीओ ताडदेवच्या प्रथमदर्शनी अहवालानुसार जेव्हा आरटीओला अपघातग्रस्त बस मिळाली, तेव्हा बसच्या आतील वायरिंग अपघातामुळे तुटले होते. बसची तपासणी करण्यासाठी बस रस्त्यावर चालविणे आवश्यक आहे. मात्र विद्युत बसचे वायरिंग तुटल्याने बस रस्त्यावर चालविणे शक्य नाही. परिणामी आरटीओ अधिकाऱ्यांनी उभ्या असलेल्या अपघातग्रस्त बसची तपासणी केली. तपासणी दरम्यान बसच्या गियर आणि हॅण्ड ब्रेकमध्ये कोणताही दोष निदर्शनास आला नाही.आरटीओ अधिकाऱ्यांच्या मतानुसार मानवी चुकीमुळे अपघात झाला आहे. चालकाने घाबरुन चुकुन एस्कलेटर दाबून गाडी फिरविली असावी, असे आरटीओ अधिकाऱ्यांचे मत आहे. सध्या अपघातग्रस्त बस बेस्ट प्रशासनाच्या ताब्यात असून उपक्रमाने चार सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे. पोलिसांच्या शिफारसीनंतर चालकाचा परवाना (लायसन्स) रद्द करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे.

## ठाण्यातील वृद्ध मारहाण प्रकरण, १४ तासांनंतर परप्रांतीय मुजोर कॅब चालकावर गुन्हा दाखल

**ठाणे : (स. गांवकरी)**



ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयाबाहेर रस्त्यावर थुंकल्याचा जाब विचारल्यामुळे वयोवृद्ध व्यक्तीला बेदम मारहाण करणाऱ्या मुजोर परप्रांतीय कॅब चालकाविरोधात कारवाई करण्यात आली आहे. अखेर 14 तासांच्या प्रतीक्षेनंतर वर्तकनगर पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून संतापाची लाट उसळली होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या मुजोर कॅब चालकाचे नाव निशांत धर शुक्ला असं आहे. मारहाण झालेले वयोवृद्ध दाम्पत्य प्रचंड घाबरल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे स्वतःहून पोलिसांत तक्रार देण्यासाठी पुढे येत नव्हते. त्यामुळे शिवसेना कार्यकर्ते नितेश पाटोळे यांनी स्वतः या प्रकरणात फिर्यादी बनून पोलिसांत रीतसर गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, ही घटना घडल्यानंतर दोन्ही शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी मुजोर चालकाचा शोध घेऊन त्याला चांगलाच चोप दिला आणि नंतर वर्तकनगर पोलिसांच्या ताब्यात दिलं. आता त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाची भीषणता पाहून राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे पोलीस आयुक्तांना थेट फोन करून कडक कारवाईचे आदेश दिले होते. त्यानुसार वर्तकनगर पोलिसांनी आरोपी निशांत शुक्ला याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या (BNS) खालील कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. BNS कलम 109 : हत्येचा प्रयत्न करणे (Attempt to Murder - जुने आयपीसी कलम 307). BNS कलम 352 : शांतता भंग करण्याच्या उद्देशाने हेतुपुरस्सर अपमान किंवा कृत्य करणे. ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयाजवळून एक वयोवृद्ध दाम्पत्य पायी जात असताना कॅब चालक निशांत शुक्ला हा त्यांच्यासमोर रस्त्यावर थुंकला. त्यावर वृद्धाने त्याला 'रस्त्यात थुंकू नकोस' एवढाच समजुतीचा सल्ला दिला. मात्र, याचा राग मनात धरून या मुजोर चालकाने थेट हातात दगड घेऊन वयोवृद्धावर हल्ला चढवला.




## शरद पवारांचा मोदी, भाजपला टोला

### वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात पवार यांची जोरदार टोलेबाजी



**मुंबई : (स. गांवकरी)**

‘पंतप्रधानपद घटनात्मक आहे. त्या पदावरील व्यक्तीचा सन्मान राखला पाहिजे. आम्ही ही सन्मान राखण्याचा प्रयत्न करतो. पण, . देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात नेहरूंचे मोठे योगदान आहे. नेहरू, इंदिरा गांधींनी देशाची प्रतिष्ठा जपली. गांधी कुटुंबाचा त्याग मोठा आहे. देशाच्या जडणघडणीत नेहरूंनी दिलेले योगदान विसरता येणार नाही, कितीही आव आणला तरी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जवाहरलाल नेहरू यांची तुलना होऊ शकत नाही,असा टोला राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी भाजपला लगावला. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचा २७ वा वर्धापन दिन पार पडला. सुरुवातीला ज्येष्ठ नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. व्यासपीठावर राष्ट्रीय कार्याध्यक्षा, खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, ज्येष्ठ नेते जयंत पाटील, आमदार जितेंद्र आव्हाड, माजी मंत्री अनिल देशमुख, आमदार रोहित पवार, माजी खासदार फौजिया खान, महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे आदींसह पक्षाचे खासदार, आमदार, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आजघडीला देशासमोर खूप प्रश्न आहेत. बेकारी, आदिवासी, महिला, अल्पसंख्याकांच्या समस्या आहे. पण, ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांना या प्रश्नांची आस्था नाही. काही लोकं देशात मोदी यांच्या सारखा नेता झालाच नाही, असे सांगून मोदी यांची नेहरूंशी तुलना करीत आहेत. मोदींना नेहरू इतकीच पंतप्रधान पदावर काम करण्याची संधी मिळाली, ही चांगली गोष्ट आहे. त्यांना आणखी या पदावर काम करण्याची संधी मिळावी, अशी त्यांच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे, त्यातही काही चुकीचे नाही. नेहरूंचा काळ, त्यांचे कर्तृत्व आणि योगदानाशी त्यांची तुलना कशी होऊ शकते.. स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी मोलाची कामगिरी केली, हे विसरून चालणार नाही. स्वातंत्र्या आधी अनेक वर्ष नेहरू तुरुंगात राहिले, संघर्ष केला. नेहरू, इंदिरा गांधी यांनी देशाची प्रतिष्ठा वाढविण्याचे काम केले. गांधी कुटुंबाने देशासाठी मोठा त्याग केला आहे, हे विसरून चालणार नाही, असेही पवार म्हणाले. रस्त्यावर उतरून काम करा. आता थांबायचे नाही. कामाला लागायचे, असे आवाहनही पवार यांनी कार्यकर्त्यांना केले. एका पक्षाची जाहिरात आज सर्व वर्तमानपत्रात पहिल्या पानावर पाहिली. मी त्या रस्त्याने कधी गेलो नाही. पण आजची तुमची ही अथांग उपस्थिती पाहिली, तर ही जाहिरात आपल्या सर्वांसाठी आहे, याचे आपण स्वागत केले पाहिजे. सत्ता असो नसो, तुम्ही कधी चिंता केली नाही.



# थोडक्यात पण महत्वाचे



## शासनाने पुरस्कार प्राप्त व्यक्तींना मानधन सुरू करण्याचे निवेदन

मुंबई /अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यभर मातंग समाजाचे अ ब क ड उपवर्गीकरण व्हावे.यासाठी अहिल्यानगर मातंग समाजाच्या वतीने मा.आमदार अमित गोरखे यांची मंत्रालय मुंबई येथे जाऊन मातंग समाजाचे ज्येष्ठ समाजसेवक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार प्राप्त नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वात व महालक्ष्मी देवस्थानचे अध्यक्ष उमेश साठे यांनी अ ब क ड उपवर्गीकरण संदर्भात निवेदन देण्यात आले. यावेळी संतोष शेलार, सतीश खळवे,राजेंद्र आल्हाट, संजय शेलार,प्रमोद आरणे, शेषराव कारखेलेकर,संजय विरूळे,गोविंद सूर्यवंशी, अविनाश साठे,लक्ष्मण तिकटे, सुदामराव आवाडे आदी उपस्थित होते. या निवेदनात सांगितल्याप्रमाणे साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार व महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त व्यक्तींना प्रति महिना १५ हजार रुपये प्रमाणे मानधन देण्यात यावे.तसेच एसटी महामंडळाच्या सर्व बसेस मध्ये विना मूल्य प्रवास सुविधा मिळावी.या मागणी चे निवेदन मातंग समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी आमदार अमितजी गोरखे यांनी असे आश्वासन सकल मातंग समाज बांधवांना दिले की लवकरच अहिल्यानगर शहरात सकल मातंग समाज मेळावा.घेण्यासाठी तारीख जाहीर करणार आहोत.व अ, ब, क, ड.उपवर्गीकरणासंदर्भात आपण दिलेले निवेदन शासनाकडे अंमलबजावणी साठी प्रयत्न करण्यात येईल.असे त्यांनी सांगितले. परिवहन मंत्री मा.नामदार प्रतापराव सरनाईक यांची मुंबई मंत्रालय येथे समक्ष भेट घेऊन निवेदन देण्यात आले.यावेळी मंत्री महोदय यांनी असे आश्वासन दिले की,मंत्रिमंडळात सदरील मागणी मंजूर करण्यासाठी पाठपुरावा करू असे आश्वासन दिले.

## नेप्ती कांदा मार्केटमध्ये शेतकऱ्याला मारहाण; चौघांविरूध्द गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : नगर तालुक्यातील नेप्ती येथील कांदा मार्केटमध्ये कांद्याच्या गोण्यांमधून कांदे काढण्याच्या कारणावरून झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. या घटनेत एका शेतकऱ्याला दुचाकीच्या चैनने डोक्यात मारून जखमी करण्यात आले असून, नगर तालुका पोलीस ठाण्यात चौघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जखमी देविदास नागरे (वय ३५, रा. महींदा, ता. आष्टी, जि. बीड) यांनी सोमवारी (८ जून) सायंकाळी फिर्याद दिली आहे. गंगाधर नागरे (रा. बारदरी, ता. अहिल्यानगर) व तीन अनोळखी विरोधात गुन्हा नोंद झाला आहे. फिर्यादी सकाळी साडेदहाच्या सुमारास नेप्ती येथील कांदा मार्केटमध्ये कांद्याच्या गोण्यांजवळ बसले होते. त्यावेळी संशयित आरोपी नागरे हा तेथे पडलेल्या कांद्याच्या गोणीतून कांदे काढत होता. यावेळी फिर्यादीने त्याला कांद्याचा लिलाव होऊ दे, त्यानंतर कांदे काढ असे सांगितल्याने आरोपी संतापला. त्याने फिर्यादीला शिवीगाळ करून तेथून निघून गेला. काही वेळानंतर नागरे हा आणखी तीन अनोळखी व्यक्तींना सोबत घेऊन घटनास्थळी परत आला. यातील तीन अनोळखी इसमांनी फिर्यादीला पकडून ठेवले, तर नागरे याने दुचाकीची चैन काढून नागरे यांना मारहाण करून जखमी केले. दरम्यान, जखमी नागरे यांच्यावर उपचार सुरू असतानाच फिर्यादीला त्यांचे चुलत भाऊ म्हातारदेव नागरे यांचा फोन आला. त्यात त्यांनाही संबंधित संशयित आरोपींनी मारहाण करून शिवीगाळ केल्याचे सांगितले.

## आराध्या कातोरे हिची सब ज्युनिअर राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड



अहिल्यानगर (स. गांवकरी) : एखाद्या खेळाडूसाठी ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची असते ,रिंगमध्ये विजय केवळ ताकतीने मिळत नाही, तर तो कठोर परिश्रम, शिस्त जिद्द, आणि आत्मविश्वास यांच्या बळावर मिळवावा लागतो . घामाचा प्रत्येक थेंबा मधून यशाचा मार्ग तयार होतो आजची मेहनत उद्याच्या यशाचा पाया असते. ज्ञानसंपदा शाळेची विद्यार्थिनी आराध्या विश्वनाथ कातोरे तिची सब जूनियर राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी 67 ते 70 या वजनी गटात निवड झाली. जळगाव येथे या स्पर्धेचा फरार रंगणार असल्याने प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. आराध्याची निवड ही शाळेसाठीअतिशय अभिमानास्पद आहे. तिला क्रीडाशिक्षक तसेच प्रशिक्षक NS,NIS ,कोच श्री ..मच्छिंद्र साळुंके यांनी उत्तम मार्गदर्शन केले. आराध्याने मिळवलेल्या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर ,शिक्षक वृंद पालक, यांनी भरभरून कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## ओतूरमध्ये उत्साहाचे वातावरण; स्वच्छता अभियान



कळवण (स. गांवकरी) :कळवण तालुक्यातील ओतूर गावात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त विविध सामाजिक, शैक्षणिक आणि प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करून हा ऐतिहासिक दिवस मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. शिवरायांच्या स्वराज्याच्या विचारांना उजाळा देत गावात स्वच्छता अभियानासह अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले. शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधत गाव परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. ग्रामस्थ, युवक आणि विविध सामाजिक संघटनांच्या सहभागातून गाव स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्याचा संदेश देण्यात आला. “स्वच्छ गाव, सुंदर गाव” या संकल्पनेला बळ देत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी ओतूर येथील इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेत उल्लेखनीय व भरघोस यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा ग्रामपंचायत कार्यालयात विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. ग्रामपंचायतीच्या वतीने विद्यार्थ्यांना विविध बक्षिसे देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. गावातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मिळवलेल्या यशाबद्दल ग्रामस्थांनी कौतुकाचा वर्षाव केला. या उपक्रमामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. तसेच गावातील सुपुत्र चरण दिपक माळी यांची भारतीय सैन्य दलात निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. गावासाठी ही अभिमानाची बाब असल्याचे सांगत ग्रामस्थांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. युवराज मोरे तसेच ग्रामस्थांच्या उपस्थितीत ग्रामपंचायतीतर्फे चरण माळी यांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. देशसेवेच्या मार्गावर वाटचाल करणाऱ्या युवकाचा सन्मान हा गावातील तरुणांसाठी प्रेरणादायी ठरला.

# 'शानदार टॅलेंट अवॉर्ड शो २०२६' दिमाखात संपन्न

## विद्यार्थ्यांना वह्या-पेन आणि महिलांना साड्यांचे वाटप




मुंबई, चर्नी रोड : (स. गांवकरी)

मुंबईतील मराठा साहित्य सभागृहात 'टॅलेंट अवॉर्ड शो २०२६' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात गायक, अभिनेते, विनोदवीर, मॉडेल्स, नर्तक, निर्माते आणि दिग्दर्शक अशा विविध क्षेत्रांत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या गुणवान कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

रमेश परमार यांनी या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले. या कार्यक्रमात समाजसेवा आणि गुणवत्तेचा गौरव यांचा सुरेख संगम पाहायला मिळाला.

या प्रसंगी, 'शेठ एन.के.टी. ट्रस्ट'ने आपल्या समाजकल्याणकारी उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वह्या व पेनचे वाटप केले. तसेच, गरजू महिलांना साड्यांचे वाटप करून समाजसेवेचा एक आगळावेगळा संदेश देण्यात आला. उपस्थित नागरिकांनी ट्रस्टच्या या सेवाकार्याची प्रशंसा केली.

या कार्यक्रमास समाजसेवक श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की, समाजाच्या प्रगतीसाठी गुणवान तरुणांना प्रोत्साहन देणे आणि शिक्षणाला प्राधान्य देणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम, सुसंस्कार आणि शिक्षण यांच्या जोरावर आयुष्यात यश मिळवण्यासाठी प्रेरित केले.

याशिवाय श्री आकाश राज पुरोहित, प्रेरणाबेन, अजय कांत, रुईया साहेब, श्री एस पी आहुजा, श्री प्रभाकर चंद्रशेखर शुक्लाजी, डॉ. विजय मून, देवदत्त गुप्ता, सुधीर सिन्हा, सुलतानशाह, सलाम शाह, अकबर साहेब, इक्बाल लखडावाला, राजेंद्र मुन्ना, प्रभाकर, गोविंद, प्रभाकर, डॉ. तरंगभाई, अरुण जलवानी, शशिकांत, शरदभाई, समीमजी, अधिवक्ता युसूफ साहेब आणि हाजी इब्राहिम शेख भाईजान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम, तसेच संगीत आणि नृत्याच्या सादरीकरणांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. गुणवंत कलाकारांच्या कामगिरीचा गौरव पुरस्कार आणि प्रमाणपत्रे देऊन करण्यात आला. शेवटी, आयोजक रमेश परमार यांनी उपस्थित सर्व पाहुणे, सहकारी आणि मान्यवरांचे आभार मानले. गुणवत्ता आणि समाजसेवेला प्रोत्साहन देण्याच्या संदेशासह 'टॅलेंट अवॉर्ड शो २०२६' हा भव्य कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

समाजसेवेच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल श्री. नानजीभाई ठक्कर यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि महिलांना साड्यांचे वाटपही करण्यात आले, जे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

कार्यक्रमादरम्यान, समाजसेवा, शिक्षण आणि जनहित या क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल श्री. नानजीभाई ठक्कर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. आयोजन समिती आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांना शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उपस्थित जनसमुदायाने प्रचंड टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले. आपल्या प्रतिसादात श्री. नानजीभाई ठक्कर यांनी आयोजकांचे आभार मानले आणि सांगितले की, समाजसेवा हे मानवी जीवनातील सर्वोत्तम कर्तव्य आहे; तसेच भविष्यातही शिक्षण, समाजकल्याण आणि मानवतावादी कार्यांमध्ये आपण सक्रिय योगदान देत राहू.

## लायका सह-विकसित शाओमी १७टी स्मार्टफोनचे भारतात आगमन

पुणे : (स. गांवकरी)

शाओमी इंडियाने आज आपल्या नव्या शाओमी १७टी या स्मार्टफोनच्या बाजारपेठेतील आगमनाची घोषणा केली. प्रगत छायाचित्रण तंत्रज्ञान, उत्कृष्ट मनोरंजन अनुभव, दमदार कार्यक्षमता आणि दीर्घकाळ टिकणारी बॅटरी यांचा संगम असलेला हा स्मार्टफोन आकर्षक ध्वजवाहक दर्जाच्या रचनेत सादर करण्यात आला आहे. लायका तंत्रज्ञानाच्या सहकार्याने विकसित केलेली छायाचित्रण व्यवस्था, डोळ्यांची काळजी घेणारी पडदा प्रणाली आणि मोठ्या क्षमतेची बॅटरी यामुळे हा दूरध्वनी प्रीमियम अनुभव देण्यास सक्षम ठरतो. जीवनातील अनेक महत्त्वाचे क्षण क्षणभंगुर असतात. अचानक ठरलेला प्रवास, उशिरापर्यंत चाललेला संगीत कार्यक्रम, कौटुंबिक समारंभ किंवा काही क्षण टिकणारा भावनिक हावभाव – अशा प्रत्येक आठवणी अचूकपणे जतन करण्यासाठी शाओमी १७टी तयार



करण्यात आला आहे. या दूरध्वनीमध्ये लायका तंत्रज्ञानाने समर्थित त्रिस्तरीय छायाचित्रण व्यवस्था देण्यात आली आहे. यामध्ये ५० दशलक्ष बिंदू क्षमतेचा मुख्य कॅमेरा असून, शाओमी टी मालिकेत प्रथमच लायका ५ पट पेरिस्कोप दूरदृश्य कॅमेरा देण्यात आला आहे. जवळील सूक्ष्म तपशील असोत किंवा दूरवरील दृश्ये, ही यंत्रणा स्पष्टता आणि अचूकता प्रदान करते. शाओमी १७टीमध्ये ‘लायका सजीव क्षण’ हे नवीन वैशिष्ट्यही समाविष्ट करण्यात आले आहे. हे तंत्रज्ञान केवळ एखादा क्षण टिपत नाही, तर त्या क्षणाच्या आधीची हालचाल, भावना आणि वातावरणही जतन करते.

## जनगणनेत अहिल्यानगर महानगरपालिका राज्यात द्वितीय

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

भारत सरकारच्या गृह मंत्रालयामार्फत राबविण्यात आलेल्या जनगणना मोहिमेत अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात द्वितीय क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

३० दिवसांसाठी नियोजित असलेले जनगणनेचे उद्दिष्ट केवळ २१ दिवसांत पूर्ण करून महानगरपालिकेने कार्यक्षमता, प्रभावी नियोजन आणि संघभावनेचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे.

या यशामागे प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त यशवंत डांगे, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, जनगणना कक्ष प्रमुख राकेश कोतकर, सर्व प्रभाग अधिकारी, ब्रँड ॲम्बेसेडर डॉ. अमोल बागुल, मास्टर ट्रेनर्स, प्रगणक, पर्यवेक्षक तसेच तांत्रिक पथक यांचे समन्वयपूर्ण नेतृत्व आणि अथक परिश्रम मोलाचे ठरले. या यशाबाबत




आयुक्त डांगे म्हणाले, “नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद हे या मोहिमेच्या यशाचे प्रमुख कारण ठरले. प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने स्वतःसाठी वेळेची उद्दिष्टे निश्चित करून शिस्तबद्ध पद्धतीने काम केले. त्यामुळे जनगणना मोहिमेला अपेक्षेपेक्षा अधिक गती मिळाली. मोहिमेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणी तातडीने सोडविण्यात आल्या. तसेच दर चार दिवसांनी आढावा बैठका घेऊन पुढील टप्प्यांचे नियोजन आणि आवश्यक उपाययोजना निश्चित करण्यात आल्या. त्यामुळे संपूर्ण मोहिमेत सातत्य, वेग आणि अचूकता कायम राखणे शक्य झाले.”

अतिरिक्त आयुक्त मुतकेकर यांनी सांगितले की, जनजागृती आणि संवादावर विशेष भर देण्यात आला. त्यासाठी विविध नावीन्यपूर्ण माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. प्रेरणादायी गीते, माहितीपर चित्रफिती, दैनंदिन ग्राफिक संदेश, आकाशवाणीवरील मुलाखती, जिंगल्स तसेच विविध समाजमाध्यमांद्वारे नागरिक, प्रगणक आणि पर्यवेक्षक यांचे सातत्याने प्रबोधन करण्यात आले. त्यामुळे मोहिमेला व्यापक लोकसहभाग लाभला. अचूक माहिती संकलन, वेळेचे काटेकोर नियोजन, प्रभावी जनजागृती आणि संघभावनेच्या बळावर अहिल्यानगर महानगरपालिकेने राज्यात मानाचे स्थान मिळविले आहे. ही कामगिरी भविष्यातील प्रशासकीय उपक्रमांसाठी प्रेरणादायी ठरणारी असून जनगणना कार्यात योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी, कर्मचारी, प्रगणक, पर्यवेक्षक आणि सहायक पथकाचे सर्व स्तरांतून अभिनंदन करण्यात येत आहे.

## सोलापूर विधान परिषदेची निवडणूक की निष्ठेची परीक्षा?

सोलापूर : (स. गांवकरी)

सोलापूर विधान परिषदेची निवडणूक की निष्ठेची परीक्षा? असे चित्र सध्या सोलापूर जिल्ह्यात सर्वत्र दिसत आहे. सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या या निवडणुकीच्या निकालानंतर कुणाची कस लागणार !! आहे की, कुणाची प्रतिष्ठा जाणार ? आहे असे आजचे चित्र सर्वत्र बघायला मिळत आहे. सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेची "निवडणूक विधान परिषदेची आणि साखर पेरणी विधानसभेची!" अशी चर्चा सध्या जुळे सोलापूरपासून ते महापालिकेच्या कॉरिडॉरपर्यंत रंगताना दिसत आहे. सोलापूर महानगरपालिकेच्या सभागृह नेत्यांच्या कार्यालयात सकाळ, दुपार आणि संध्याकाळ अशा तिन्ही वेळा काही निष्ठावंत शिलेदारांची उपस्थिती कायम असल्याचे बोलले जाते. त्यांच्या चेहऱ्यावर एकच प्रश्न स्पष्ट दिसतो – "लक्ष्मी दर्शन कधी होणार?" राजकीय वर्तुळात मात्र वेगळीच कुजबुज सुरू आहे.



लक्ष्मी दर्शन झाले तरी अंतिम शब्द कोणाचा, यावर अनेकांची उत्सुकता वाढली आहे. काहींच्या मते सभागृह नेते नरेंद्र काळे यांची राजकीय चाल वेगळी असली तरी अंतिम सूत्रे अजूनही "बापू" यांच्या हातातच असल्याचे जाणकार सांगतात. दरम्यान, राजाभाऊ राऊत यांनी लक्ष्मी दर्शनाचा संपूर्ण कोटा बापूंच्या ताब्यात दिल्याची चर्चा राजकीय गोटात जोर धरत आहे. मतदानाची संपूर्ण जबाबदारीही बापूंकडेच राहणार असल्याने अनेकांचे राजकीय गणित बदलले असल्याचे बोलले जाते. बापूंचे काही शिलेदार मात्र सभागृह नेत्यांना अप्रत्यक्षपणे "आमची भूमिका स्वतंत्र असेल" असे सांगत असल्याची माहिती मिळते. पण राजकारणात जे दिसते तेच सत्य असते असे नाही. पडद्यामागे वेगळ्याच हालचाली सुरू असल्याची चर्चा आहे. जुळे सोलापूर परिसरात ज्येष्ठ नागरिकांच्या कट्ट्यावर या विषयाची रंगलेली चर्चा विशेष लक्षवेधी ठरत आहे. "ही निष्ठा नाही, ही तर बापूंवरील अपार विश्वासाची विष्ठा आहे," असे मत काही ज्येष्ठ व्यक्त करताना दिसतात. नगरसेवकांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी बापू गटाकडून आणि मनीष भैयांच्या मार्गदर्शनाखाली आडदांड आंडू आणि पांडू यांची विशेष नियुक्ती झाल्याची राजकीय गोष्टही रंगवून सांगितली जात आहे. एवढेच नव्हे तर "बापूंचे विशेष श्वान पथक" सुद्धा सज्ज असल्याची मिश्किल चर्चा राजकीय वर्तुळात ऐकायला मिळते. दक्षिण सोलापूर शहरातील नगरसेवकांची जबाबदारी नरेंद्र काळे यांच्यावर सोपविण्यात आली असली तरी लक्ष्मी दर्शनाची चावी मात्र अजूनही बापूंच्याच खिशात असल्याचे खात्रीलायक सूत्र सांगत आहेत. यामध्ये पंचवीस हजार रुपयांचा मानाचा आहेर आणि दोन वेळच्या भोजनाची व्यवस्था असल्याची गोपनीय माहितीही पुढे येत आहे. त्यामुळे निष्ठा, विश्वास, लक्ष्मी दर्शन आणि राजकीय गणित यांचा संगम झालेली ही निवडणूक सध्या शहरातील सर्वात चर्चेची गोष्ट ठरली आहे.

## तीर्थक्षेत्र अक्कलकोटचा प्रसाद योजनेत समावेश करण्याची मागणी

अक्कलकोट : (स. गांवकरी)

राज्यातील प्रसिद्ध असलेल्या अक्कलकोटचा केंद्र सरकारच्या तीर्थयात्रा पुनरूज्जीवन तसेच आध्यात्मिक आणि वारसा संवर्धन अभियान [प्रसाद] योजनेत समावेश करावा अशी मागणी सकल स्वामीभक्तसह अक्कलकोट शहरातील नागरिकाकडून जोर धरत आहे महाराष्ट्रातील त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी केंद्र सरकारने प्रसाद योजनेअंतर्गत मंजुरी दिल्याच्या पार्श्वभूमीवर अक्कलकोटलाही योजनेचालाभ मिळावी अशी अपेक्षा स्वामीभक्त व नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या वास्तव्यामुळे अक्कलकोटला देशभरातून तसेच परदेशातूनही मोठ्या प्रमाणावर भाविक भेट




असतात वर्षभर लाखो भक्त येथे दर्शनासाठी येत असल्याने शहरातील पायाभूत सुविधांचा अधिक व्यापक विकास होण्याची आवश्यकता आहे दरम्यान आमदार श्री सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषद पदाधिकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत रस्ते स्वच्छता मंदिर परिसर सुशोभीकरण आणि मूलभूत नागरिक सुविधांमध्ये सुधारण्या करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे मात्र केंद्राच्या प्रसाद योजनेत समावेश झाल्यास अक्कलकोट शहराचा सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळू शकते.

# अक्कलकोट नगर परिषदने सुरू केले पावसाळा पूर्व स्वच्छतेची कामे

## जाणून बुजून रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कारवाई होणार

अक्कलकोट : (स. गांवकरी)

अक्कलकोट नगर परिषदने पावसाळा पूर्व स्वच्छतेची कामे मोठ्या प्रमाणात सुरू केले असून जर जाणून बुजून रस्त्यावर कोणी कचरा टाकत असेल आणि गटारी मध्ये कचरा टाकून गटारी अडविण्याचे प्रयत्न करत असेल तर कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे अशी माहिती आरोग्य विभागाने दिली . पावसाळा पूर्व सुरू असलेल्या कामांवर स्वतः आरोग्य समितीचे सभापती अविनाश मडीखांबे हे लक्ष ठेवून असून ते समोर थांबून स्वच्छता करून घेत आहेत असेही माहिती देण्यात आली.



पावसाळा सुरू होण्यापूर्वी अक्कलकोट नगर परिषदेचे नगराध्यक्ष मा. मिलन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य सभापती अविनाश मडीखांबे आणि संपूर्ण आरोग्य विभाग कामाला लागला असून सर्वत्र पावसाळा पूर्ण कामे वेगाने करण्यात येत आहेत. पावसाळा पूर्व कामाला सर्वत्र सुरुवात झाली आहे आरोग्य समितीचे सभापती अविनाश मडीखांबे हे स्वतः कामकाजावर देखरेख ठेवून असून प्रत्यक्ष समोर थांबून ते गटारी साफ करून घेणे नाले सफाई करून घेणे छोटे मोठे खड्डे बुजवून तेथे सपाटीकरण करून घेणे, तुंबलेल्या गटारी स्वच्छ करून घेणे असे सर्व कामे वेगाने सुरू केली आहेत. अक्कलकोट शहरातील सर्व प्रभागात अनेक रुंद अरुंद लहान मोठे नाले, गटारी असुन पाण्याचा निचरा होण्यासाठी मागील काही पावसाळ्याचा अनुभव पाहता अनेक गल्लीत पाणी साचते, घरात पाणी सुद्धा गेलेले उदाहरणे आहेत त्यामुळे संभाव्य धोका ओळखून पावसाला सुरू होण्यापूर्वी नगराध्यक्ष मिलनदादा कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आरोग्यदूत, कार्यसम्राट आरोग्य सभापती अविनाश मडीखांबे आणि आरोग्य विभाग जोमाने कामाला लागले असून रोज एका वार्डातील तुंबलेले नाले , गटारी पावसाळा सुरू होण्यापूर्वी स्वच्छ करण्याचे काम सुरू केले आहे आणि त्या दृष्टीने पाऊले उचलली आहेत नागरिकांना सहकार्य करणे गरजेचे असून तशा आरोग्य सभापती यांना भेटून तुंबलेल्या गटारी व नाल्या बद्दल माहिती द्यावी असे नम्र आवाहन आरोग्य समितीचे सभापती अविनाश मडीखांबे यांनी नागरिकांना केले आहे.

प्रभाग क्रमांक 4 मध्ये मोठ्या प्रमाणात दैनंदिन स्वच्छता सुरू करण्यात आली असून जाणून बुजून जे कोणी मुद्दाम हून रस्त्यावर कचरा टाकून किंवा गटारी मध्ये कचरा टाकून गटारी अडविण्याचे कामे करत आहेत अशा लोकांवर पोलिस केसेस करून दंड ठोठावण्यात येणार हे तरी कोणीही जाणून बुजून रस्त्यावर अथवा शौचालया जवळ किंवा मुतारी च्या रस्त्यात कींव गटारी मध्ये कचरा टाकून गटारी अडविण्याचे प्रयत्न करत असतील तर त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई केली जाणार आहे सापवाले सारखे लोक विकास कामात अडथळा निर्माण करून लोकांना भडकवण्याचे चिथावणी देण्याचे काम करत आहेत. अशा लोकांनी स्वतः सावध व्हावे अन्यथा त्यांच्यावर रीतसर कारवाई करण्यात येईल. असेही आवाहन करण्यात आले आहे.




महाराष्ट्र शासनाचे अहिल्यानगर जिल्ह्यातील माहिती व प्रसारण विभागातील जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील साहेब यांची शिर्डी येथे भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा करण्यात आली यावेळी दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या वतीने त्यांचा घड्याळ पेन हरिपाठ शाल देऊन सत्कार करताना दैनिक समर्थ गावकरीचे संपादक डॉक्टर विश्वास आरोटे औरंगाबाद विभागीय संपादक कुंडलिक वाळेकर शिर्डी प्रतिनिधी राहुल फुंदे लक्ष्मण झाडे. कुसळकर

# माहिती मागणाऱ्या ग्रामस्थाला ग्रामसेवकाकडून चपलाने मारहाण

- मस्तवलेल्या अधिकाऱ्यांना गडचिरोलीला पाठवा संतप्त ग्रामस्थांचा सवाल
- मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी ॲक्शन मोडमध्ये कधी येणार



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

पाथर्डी : (स. गांवकरी)

पाथर्डी तालुक्यातील अकोला ग्रामपंचायत व अकोले तालुक्यातील पंचायत समिती ग्रामसेवक व अधिकाऱ्यांमुळे जिल्हा परिषदेच्या कारभाराचे वाभाडे

पाथर्डी- अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील अकोला ग्रामपंचायतीची माहिती मागणाऱ्या तरुणाला ग्रामेवकाने चपलेने मारहाण केल्याचा धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे. पाथर्डी तालुक्यातील अकोला गावचा ग्रामसेवक अशोक खेडकर याला गावातील तरुण बबन गर्जे याने माहिती मागितली असता ग्रामसेवकला राग अनावर झाल्याने त्याने तरुणाला चक्क चपलेने मारहाण केल्याचे व्हिडिओमधे दिसत आहे. तसंच लेखी अर्ज सुद्धा ग्रामसेवकाने फाडून टाकल्याचा आरोप तरुणाने केला आहे. अहमदनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी करतात काय.. जिल्हा परिषदेला सध्या ची प सदस्य व जिल्हा परिषद अध्यक्ष पदाधिकारी नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात अधिकारी वर्गाचे ग्रामीण भागात दुर्लक्ष झाले आहे एकीकडे पाथर्डी तालुक्यातील अकोला ग्रामपंचायतचे ग्रामसेवक दिवसा ढवळ्या माहिती मागणाऱ्या एका युवकाला चपलाने मारहाण करतात तर दुसरीकडे मात्र अकोले पंचायत समिती पाणीपुरवठा विभागातील उपअभियंता व अनेक कर्मचारी कार्यालयात नसतात हे पत्रकारांनी दाखवून दिले तरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कारवाई करण्यास अद्यापही वेळ मिळत नाही का उलट जलसंधारण योजनेचे तीन तेरा नऊ बारा वाजले निधी नसल्यामुळे ठेकेदार काम करण्यास तयार नाही या योजना प्रत्यक्ष कागदपत्रे पूर्णत्व गेल्या का मान्सून काही दिवसांवर येऊन ठेपला आहे आजही पाहण्यासाठी ग्रामीण भागातील महिलांना टँकर व विहीर बारव यावर जावे लागते आढावा घेतला जातो ठेकेदार तिकडे फिरकत नाही काल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी याबाबत बैठक बोलावली या बैठकीला अनेकांनी दांड्या मारल्या ठेकेदार येण्यास तयार नाही अनेक योजना कागदपत्रे तयार आहेत प्रत्यक्ष कोणी जाण्यास तयार नाही अकोले पंचायत समिती मध्ये कागदपत्रे अनेक विहिरींचे कामे झाली तर रात्रीतून विहिरींना पाय फुटले विहिरी गायब आहे या विहिरींची देखील चौकशी झाली पाहिजे विहिरी गेल्यात कुठे चित्रपटात मकरंद अनासपुरे यांनी माझी विहीर चोरीला गेली माझ्या विहिरीतील खेकडे मासे चोरीला गेले ते कोणत्या अधिकाऱ्यांनी खाल्ले असाच प्रकार अकोले पंचायत समितीमध्ये विहिरी गायब झाले आहेत अहो सीओ साहेब काजवा महोत्सव पाहण्यासाठी तुम्ही येता याबद्दल तुमचे अभिनंदन आहे पण प्रत्यक्ष पंचायत समितीमध्ये कोणत्याही विभागावर कोणाचे लक्ष नाही शिक्षण विभागावर गट शिक्षण अधिकारी प्रभारी राज तर दुसरीकडे मात्र पाणीपुरवठा विभाग हा मात्र असून नसल्यासारखे सोंग घेऊन बसला आहे या ठिकाणी ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामपंचायतींनी पत्र दिले या पत्रांना मात्र केराची टोपली दाखवली का बेलापूर ग्रामपंचायत पिण्याच्या पाण्यावरून वाद निर्माण झाला या वादाला कोणत्या अधिकाऱ्याने खतपाणी घातले दैनंदिन कामकाज करत असताना दैनंदिन मीटिंग असल्याचे नाटक केले जाते प्रत्यक्ष कामावर सही करून सयाजीराव साईडचे नाव सांगतात साईट कोठे चालू आहेत दुसरीकडे ठेकेदारांनी फाईल पाठवल्यानंतर एमबी च्या फाईलवर सही घेण्यासाठी दक्षिणा दिल्याशिवाय सही होत नाही आता तरी भंडारी साहेब तुम्ही आक्रमक होणार की नाही चौकशी करणार की नाही या महाराष्ट्राला एक सुजलाम सुफलाम बनण्याचे स्वप्न तुकाराम मुंडेसारख्या अधिकाऱ्यातून होत आहे त्यांचा आदर्श घेणार की नाही एक ग्रामसेवक एका तरुणाला चपलाने मारहाण करतो तर दुसरीकडे मात्र पंचायत समितीमध्ये अधिकारी पगारापुरते घेतले आहेत का शासन आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे पगार आमच्या टॅक्स मधून जातो मग आमचे कामे करायला का हे अधिकारी जचावत नाही न्यू तिच्या ठिकाणी राहणे बंधनकारक असताना ते राहत का नाही त्यांची देखील चौकशी झाली पाहिजे घर उशाला कार्यालय शेजारी असल्यामुळे नेहमी हालचाल रजिस्टर वर कोणती नोंद केली जाते हे देखील पाहणे तेवढे महत्वाचे आहे गटविकास अधिकारी अमरजी माने कारवाई करणार की नाही किती जणांचा बळी गेल्यानंतर कारवाई करणार असा संतत सवाल चालू झाला आहे नगर जिल्ह्यातील पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील या प्रकरणाकडे लक्ष देणार की नाही असा संतप्त सवाल देखील व्यक्त होऊ लागला आहे.

या नगर जिल्ह्याला दोन विरोधी खासदार असून केंद्रातले सरकार सत्ताधारी पक्षाचे राज्यातील सरकार सत्ताधारी पक्षाचे विरोधक मात्र मावळला त्यामुळे जिल्हा परिषदेला सध्या कोणी वाली नाही नगर जिल्ह्यातील 14 तालुक्यातील ग्रामपंचायत कारभार कोणाच्या भरवशावर चालू आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### मानद डॉक्टरेट मिळाल्याबद्दल डॉ. सुनिल सकट यांचा सत्कार

- पर्यावरण क्षेत्रात डॉ. सुनिल सकट यांचे मोठे योगदान - उपमहापौर धनंजय जाधव


अहिल्यानगर (स. गांवकरी) : डॉ. सुनिल सकट यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक व पर्यावरण क्षेत्रात विविध उपक्रम राबविले आहेत. गरजू,वंचित आणि दुर्बल घटकांसाठी मदतकार्य,पर्यावरण संवर्धन मोहिम,सामाजिक जनजागृती, रक्तदान तसेच युवकांना, महिलांना प्रेरणा देणारे उपक्रम यांच्या माध्यमातून त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.एक पेड मा के नाम हा उपक्रम त्यांनी राबवला आहे. सामाजीक, पर्यावरण आणि वंचित घटकांसाठी सातत्याने कार्य करणारे महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहिर डॉ.अण्णा भाऊ साठे पुरस्कार प्राप्त डॉ.सुनिल सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाली. ही अभिमानास्पद बाब आहे. पर्यावरण क्षेत्रात डॉ.सुनील सकट यांचे मोठे योगदान आहे.असे प्रतिपादन "उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले आहे. दिल्ली येथील "मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशन" च्या वतीने नुकतीच त्यांना सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ.सुनील सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल उपमहापौर धनंजय जाधव यांनी त्यांचा सत्कार केला.

## मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती अनुदान

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

महाराष्ट्र व गोवा राज्य तसेच दादरा-नगर हवेली आणि दमण-दीव केंद्रशासित प्रदेशातील बीडी, सिनी, चुनखडी दगड, डोलोमाईट, लोह-मँगनीज व क्रोम धातूच्या खाणीतील कामगारांच्या मुला-मुलींना शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर (NSP) ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. योजनेअंतर्गत इयत्ता 1 ली ते 4 थीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वार्षिक 1 हजार रुपये, इयत्ता 5 वी ते 8 वीपर्यंत 1 हजार 500 रुपये, इयत्ता 9 वी ते 10 वीपर्यंत 2 हजार रुपये, तर इयत्ता 11 वी व 12 वीच्या विद्यार्थ्यांना 3 हजार रुपये आर्थिक सहाय्य दिले जाईल. आयटीआय, पॉलिटेक्निक आणि पदवी अभ्यासक्रम (बीएससी, कृषी पदवीसह) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना 6 हजार रुपये, तर बीई, एमबीबीएस, एमबीए यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी 25 हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. अर्ज प्रक्रिया 1 जून 2026 पासून सुरू झाली असून प्री-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत 31 ऑगस्ट 2026 आहे. पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्तीसाठी 31 ऑक्टोबर 2026 पर्यंत अर्ज करता येणार आहेत. पात्रता, अटी व अर्जाची सविस्तर माहिती राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल (scholarships.gov.in) वर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्जासोबत आवश्यक कागदपत्रांच्या स्पष्ट व वाचनीय स्कॅन प्रती अपलोड कराव्यात. अर्ज सादर केल्यानंतर संबंधित शैक्षणिक संस्थेकडून त्याची पडताळणी झाली आहे की नाही.

## अकोले येथे अधिकमासात प्रवचन सोहळा



- अगस्ती महाराज यांनी दक्षिणेतील पहिला आश्रम अकोल्यात स्थापन केला - गोविंदगिरी महाराज

अकोले : (स. गांवकरी)

अकोल्याची भूमी असामान्य असून दक्षिणेतील पहिला आश्रम येथे स्थापन केला. या आश्रमात त्यांनी प्रभू श्रीराम यांना शस्त्र आगर दाखवले, रावणाला मारण्यासाठी बाण दिला. राक्षसांचा विनाश करण्यात या आश्रमाचे महत्व आहे. असे प्रतिपादन श्रीराम मंदिर ट्रस्ट अयोध्या चे कोषाध्यक्ष स्वामी गुरु गोविंद गिरीजी महाराज यांनी केले.

अकोले येथील अगस्ती आश्रमात पुरुषोत्तम अधिक मास निमित्ताने महिनाभर अखंड कीर्तनमोहत्सव आयोजित करण्यात आला यामध्ये गोविंदगिरीजी महाराज बोलत होते. यावेळी आमदार किरण लहामटे, अगस्ती देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष ॲड के. डी. धुमाळ, प्राचार्य डॉ अनिल सहस्रबुद्धे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उत्तर नगर जिल्हा कार्यवाह दिपक जोंधळे, आदी उपस्थित होते.

भारत राष्ट्र हे धर्माच्या आधारावर आधारित राष्ट्र असून सनातन धर्माचा पाया आपला देश आहे. सनातन धर्म समानतेचा आहे. याच्यासाठी आपण जीवन समर्पित करावे. इच्छा शक्ती असेल तर प्रभू श्रीराम यांचे मंदिर भव्य दिव्य उभारण्यात आले.

अगस्ती महाराज यांचे दहा पुत्र राक्षसांनी मारले यामुळे त्यांचा विनाश करण्याचे नियोजन केले. यासाठी अनेक आश्रम स्थापन केले. अकोलेत अगस्ती महाराज लोपमुद्रा मातेसह राहिले यामुळे ही भूमी पवित्र आहे. आदित्य स्तोत्राची निर्मिती केली त्याचा महिमा आजही आहे असेही मत त्यांनी व्यक्त केले. अमृतवाहिनी प्रवरा माता ही अत्यंत पवित्र असून तिच्या तीरावर अकोल्यात अगस्ती आश्रम व नेवासा येथे ज्ञानेश्वरी चे लिखाण झाले आहे. गोदावरी स्नान व प्रवरा पान म्हणजे प्रवरा नदीचे पाणी पिणे कारण ते शुद्ध असून औषधी जल आहे अशीही माहिती दिली. प्रवरेच्या तीरावरील आपण सर्व बंधू आहोत. असेही महाराज यांनी म्हटले. अकोले मतदारसंघाचे आमदार किरण लहामटे यांनी मला मनाला समाधान मिळावे यासाठी मी आठवड्यातून दोन तीन वेळा दर्शनासाठी येतो. अगस्ती देवस्थानचा विकास करण्यासाठी सर्वोत्परी प्रयत्न करू अशी ग्वाही दिली. अगस्ती देवस्थानचे अध्यक्ष ॲड के. डी. धुमाळ यांनी प्रभू श्रीराम कॉरिडॉर मध्ये अगस्ती देवस्थानचा चा समावेश करून देवस्थान चा विकास करावा यासाठी गुरू गोविंद गिरीजी महाराज यांनी प्रयत्न करावे अशी मागणी केली. अयोध्येतील प्रभू श्रीराम यांचे मंदिरात अगस्ती महाराज यांची मूर्ती बसवली तिची प्रतिकृती अकोले आश्रमातील मूर्तीसारखी गुरू गोविंदगिरीजी महाराज यांनी बनवली. हा अगस्ती आश्रमाचा गौरव आहे असे मत दिपक महाराज देशमुख यांनी व्यक्त केले. प्रवरा पुलावर प्रवरा मातेचे पूजन करण्यात आली. अगस्ती महाराज गुरुकुल च्या विद्यार्थ्यांनी संकेत महाराज आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली टाळ मृदुंगाच्या गजरात मिरवणूक काढली.

अगस्ती महाराज यांचे दर्शन हे माझे महत भाग्य आहे. रामायणात प्रभू श्रीराम यांचे नावाने पाषाण पाण्यावर तरंगत होते. जय श्रीराम यांचे घोषणेने बंगाल जिंकले हा रामनामा चा महिमा आहे.

## कल्पित प्रमाणे युवा उद्योजक तयार व्हावेत : मा. मंत्री बाळासाहेब थोरात

### कल्पित वाकचौरे यांना युवा उद्योजक म्हणून राज्यस्तरीय पुरस्कार

अकोले : (स. गांवकरी)




अल्प कालावधित उद्योग क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केल्यामुळे युवा उद्योजक कल्पित विजय वाकचौरे यांना तेजस प्रतिष्ठाणच्या वतीने सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम मालपाणी लॉन्स संगमनेर येथे नुकताच पार पडला. यावेळी महा. राज्याचे महसुलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी कल्पित वाकचौरे यांचे तोंडभरुन कौतुक केले. आत्ता निटचे पेपर फुटत आहेत त्यामुळे गोर गरिबांची मुले नोकरीत लागतील अशी परिस्थिती नाही. त्यामुळे तरुणांनी उद्योग व्यावसायात आपले पाय रोवले पाहिजे असे म्हणत थोरातांनी सरकारला टोला देत तरुणांना आवाहन केले. कल्पित हे सध्या फक्त महाराष्ट्र व भारतापुरते मर्यादीत राहिले नसून परदेशात देखील त्यांनी चांगले पाय रोवले आहेत. शेकडो तरुणांना रोजगार मिळेल अशी गुंतवणुक त्यांनी केली असून आता अकोले संगमनेर सारख्या ठिकाणी मोठे प्रोजेक्ट सुरु झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून निश्चित नव्या पिढाला दिशा आणि प्रेरणा मिळेल अशी मला खात्री आहे असे गौरव उद्गार थोरात यांनी काढले. यावेळी व्यासपिठावर अकोले तालुक्याचे आमदार आ. डॉ. किरण लहामटे, रिपाईचे राज्य सचिव विजयराव वाकचौरे, तेजस फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. रविंद्र घोसाळे उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. संघराज रुपवते होते. कल्पित वाकचौरे यांनी आई वडिलांचे नाव डोळ्यासमोर ठेवून सहा वर्षापुर्वी विराजश्री कंपनीची स्थापना केली होती. त्या माध्यमातून त्यांनी पुण्यात आईस्क्रिम पार्लरसह छोटे मोठे उद्योग सुरु केले होते. त्यात त्यांना चांगले यश आले. विजयराव वाकचौरे यांच्या चळवळीतील बड्यो लोकांच्या ओळखी आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या सहवासात राहून विविध उद्योगांना त्यांनी समजून घेतले. ते उभे करण्यासाठी कोट्यावधी रुपयांचे भांडवल लागते. त्याची तजबिज करुन फुड प्रोसेसिंग, मिल्क प्रोडक्ट, लॅण्ड डेव्हलपमेंट, कन्सल्टिंग, शेती, ग्रामीण भागातील मागासवर्गीयांसाठी शिक्षण अशी विविध क्षेत्रात त्यांनी स्वतःच्या नावाचा ठसा उमटविला आहे. पुणे, मुंबई, नाशिक, अकोले, संगमनेर, कोकण, श्रीगोंदा यांसह महाराष्ट्रात विविध ठिकाणी त्यांचे प्रोजेक्ट सुरु आहेत.

हा विस्तार केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर आता दुबई, अमेरीका व आणि अन्य ठिकाणी देखील सुरु होत आहेत. त्यामुळे, एका मागासवर्गीय आणि गरिब कुटुंबातून पुढे आलेला अवघ्या तिशीतील तरुण इतकी उतुंग भरारी घेतोय, ही अकोले आणि संगमनेरसाठी अभिमानाची बाब आहे. कल्पित वाकचौरे यांनी केवळ उद्योग व्यावसाय म्हणून नाव कमविले असेच नव्हे तर अनाथ मुलांना मदत करणे, शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविणे, गरजू विद्यार्थ्यांच्या फि भरणे, अन्नदान करणे, तरुणांना प्रेरणा मिळावी म्हणून विविध ठिकाणी आर्थिक मदत करणे, बक्षिसे देणे, शिव-फुले-शाहु-आंबेडकर चळवळीत योगदान देणे अशा विविध गोष्टींतून त्यांनी समाजिक काम केले आहे.

त्यामुळे, त्यांना संविधान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सध्या केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी कल्पित वाकचौरे यांच्यावर महाराष्ट्राच्या उद्योग आघाडीचे अध्यक्षपद सोपविले असून संपुर्ण महाराष्ट्रात त्यांचे जोरदार काम सुरु आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होते असून विविध क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होते आहे.

## अँब्युलन्स मिळाली नाही, नवजात बालकाचा मृत्यू

### डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे जीव गेला : नात रंजनाबाई माळी यांचा आरोप

- "दोषी डॉक्टर व अँब्युलन्स चालकावर गुन्हा दाखल करा" – तक्रार
- कळवण उपजिल्हा रुग्णालयातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर

कनाशी : (स. गांवकरी)




अँब्युलन्स वेळेवर मिळाली असती तर माझे नातू वाचले असते" असा हंबरडा फोडत विशापूर येथील रंजनाबाई काकाजी माळी यांनी कळवण उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व अँब्युलन्स चालकाविरोधात गंभीर आरोप केले आहेत. नवजात बालकाच्या मृत्यूनंतर त्यांनी थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारीनुसार, रंजनाबाईंची सून दिपाली केवळ माळी हिला प्रसूतीसाठी दि. ६ जून रोजी संध्याकाळी ४ वाजता कळवण उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. त्याच दिवशी संध्याकाळी दिपाली प्रसूत झाली. दि. ९ जून रोजी दुपारच्या सुमारास बाळाला आईने दूध पाजले. त्यानंतर बाळाला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. डॉक्टरांनी धावतपळत उपचार करून बाळाला नाशिक जिल्हा रुग्णालयात रेफर करण्यास सांगितले.

दरम्यान, १०८ अँब्युलन्सला दुपारी ३ वाजताच्या सुमारास फोन केला. मात्र कळवण येथे अँब्युलन्स उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. दि. ९ जून रोजी रात्री ८:३० वाजेच्या दरम्यान बाळाचा मृत्यू झाला.

रंजनाबाईंचा आरोप आहे की, "डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे व वेळेवर अँब्युलन्स न मिळाल्याने आमचे बाळ मरण पावले. डॉक्टरांनी वेळेवर अँब्युलन्स उपलब्ध करून देणे बंधनकारक असूनही त्यांनी माझ्यावर दबाव टाकून कोणतीही माहिती दिली नाही. आमच्या कागदावर अंगठा घेऊन घेतला.

संबंधित डॉक्टर, कर्मचारी व अँब्युलन्स चालकावर गुन्हा दाखल करून आम्हाला न्याय द्यावा," अशी मागणी रंजनाबाई काकाजी माळी यांनी तक्रारीत केली आहे. आरोग्य यंत्रणेचे तीनतेरा वाजले आहेत

कळवणसारख्या तालुक्याच्या ठिकाणी १०८ अँब्युलन्स वेळेवर उपलब्ध होत नसेल, तर ग्रामीण भागातील रुग्णांचे काय? एका निष्पाप जीवाचा बळी गेल्यानंतर तरी आरोग्य यंत्रणा जागी होणार का, असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे. आंदोलनाला सर्व पक्षीय कार्यकर्ते रुग्णाचे नातेवाईक उपस्थितत होते.

### भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांचे कार्यालय, शिर्डी

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणेचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ (१) नुसार अधिसुचना

**अधिसुचना**

जिल्हा :– अहिल्यानगर
क्रमांक भुसं/ कार्या/का.वि./६/६७६/२०२६/मौ.काकडी/ता.कोपरगाव/२०२६/ एलएक्यू/ एसआर/०१/२०२५

ज्याअर्थी, अहिल्यानगर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचेडील आदेश क्र. क्र–भूसं/कार्या/१६–अ/ई–२६५८१८०/२०२५ दि.३१/१०/२०२५ नुसार उक्त अधिनियमाच्या कलम ३(जी) चे तरतूदीनुसार प्रस्तुत प्रकरणी भूसंपादन प्रक्रियेचे अधिकार उपविभागीय अधिकारी शिर्डी भाग शिर्डी यांना प्रदान केले आहेत.

ज्याअर्थी, प्रदान केलेल्या प्राप्त अधिकारानुसार उपविभागीय अधिकारी शिर्डी यांनी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणेचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) याच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे असे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, अधिसूचना क्र. भूसंपादन मौजे काकडी ता. कोपरगाव एसआर–०१/२०२५/का.वि.–६/५९५/२०२६ दिनांक १० फेब्रुवारी २०२६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. सदर अधिसूचना विहीत पध्दतीने प्रसिध्द केलेली आहे. आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, अहिल्यानगर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांनी कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल (कोणताही असल्यास), विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादीत करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे. आणि म्हणुन, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) तरतुदीअन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असुन पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका–यांची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, शिर्डी तालुका राहाता जिल्हा अहिल्यानगर यांना पदनिर्देशित केले आहे.

अनुसुची – एक

जमिनीचे वर्णन — गाव – मौ. काकडी तालुका – कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर

| अ. क्र. | भुमापन किंवा गट नंबर | आवश्यक जमिनीचे अंदाजीत क्षेत्र (हे.आर) | अ. क्र. | भुमापन किंवा गट नंबर | आवश्यक जमिनीचे अंदाजीत क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६५/१ पैकी | ०.२३९५ | १० | ३७/१ पैकी | ०.१९६ |
| २ | ३४/३ पैकी | ०.०७३७ | ११ | ३७/१ पैकी | ०.११२६ |
| ३ | ३४/२ पैकी ३४/४ पैकी ३४/५ पैकी | ०.६५७९ | १२ | ३७/१ पैकी | ०.११३३ |
| | | | १३ | ३७/२ पैकी | ०.१६७६ |
| ४ | ६७ पैकी | ०.८२९४ | १४ | ३७/२ पैकी | ०.०४७३ |
| ५ | ३६/१ पैकी | ०.०९०७ | १५ | ३८ पैकी | ०.०४८८ |
| ६ | ३६/३ पैकी | ०.०६०५ | १६ | ३८ पैकी | ०.११६५ |
| ७ | ३६/२ पैकी | ०.१६०४ | १७ | ५२ पैकी | ०.१६२१ |
| ८ | ५५/२ पैकी | ०.४०११ | १८ | सरकारी रस्ता | ०.०९९१ |
| ९ | ३५/१ पैकी | ०.१२८१ | एकुण | | ३.५२८२ |

अनुसुची – दोन
सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव :– मौजे काकडी ता. कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर येथील जमिन निळवंडे–कोठे कमळेश्वर–काकडी–नांदुर्खी (प्रजिमा–१०) रस्त्याचे चौपदरीकरणासाठी भूसंपादन

प्रकल्प कार्याचे नाव :– मौजे काकडी ता. कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर येथील जमिन निळवंडे कोठे कमळेश्वर–काकडी–नांदुर्खी (प्रजिमा–१०) रस्त्याचे चौपदरीकरणासाठी भूसंपादन

समाजाला मिळणारे लाभ :– भूसंपादन करावयाचे जमिनीबाबत राज्य शासनाचा असा उद्देश आहे की, जनतेच्या सार्वजनिक हितासाठी, सुरक्षित व सुरळीत वाहतुक होणेसाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे असा सार्वजनिक हिताचा उद्देश आहे.

अनुसुची – तीन
बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :– लागु नाही.

अनुसुची – चार
सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :– प्रस्तुत प्रकरणी मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडील अधिसूचना असाधार क्र. ११ दि. ३० जानेवारी २०२६ मधील क्र. एसआयए/सी.आर.–१८/२०२६ दि. २२ जानेवारी २०२६ नुसार भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाईचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ प्रकरण दोनच्या व प्रकरण तीनच्या तरतुदी लागु करण्यापासुन सुट देण्यात आलेली आहे.

अनुसुची – पाच
नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल :– लागु नाही.

टिप :– उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

(माणिक आहेर)
भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
शिर्डी भाग शिर्डी

दिनांक : ०४ जुन २०२६
ठिकाण : शिर्डी
(जिमाका/नगर/जाहि/३१/२०२६)

# विखे पाटील यांच्या नेतृत्वामुळे शिर्डी मतदारसंघ केंद्रस्थानी

## मराठा आरक्षण, औद्योगिक वसाहत आणि जलयात्रेमुळे विकासाचा वेग वाढला : अभय शेळके

शिर्डी : (स. गांवकरी)



राज्यातील विविध राजकीय, सामाजिक आणि विकासात्मक घडामोडींमध्ये प्रभावी नेतृत्व करत पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी शिर्डी विधानसभा मतदारसंघाला राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आणले आहे. मराठा आरक्षण प्रश्नावर मनोज जरांगे यांच्यासोबत यशस्वी चर्चा, राहुरी विधानसभा व विधानपरिषद निवडणुकीतील महत्वाची भूमिका, तसेच शिर्डी औद्योगिक वसाहतीत उभा राहिलेला देशातील खासगी क्षेत्रातील पहिला तोफगोळे निर्मिती प्रकल्प यामुळे विखे पाटील यांचे नेतृत्व अधिक ठळकपणे समोर आले असल्याचे प्रतिपादन उपनगराध्यक्ष अभय शेळके यांनी केले.

पत्रकारांशी बोलताना शेळके म्हणाले की, मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्यासोबत विखे पाटील यांनी अनेकवेळा सकारात्मक चर्चा करत तोडगा काढण्याची भूमिका निभावली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाला इतर मागासवर्गीयांप्रमाणे शैक्षणिक सुविधा व सवलती लागू करण्याचा घेतलेला निर्णय हा ऐतिहासिक आणि क्रांतिकारी असल्याचे त्यांनी सांगितले. राहुरी विधानसभा आणि विधानपरिषद निवडणुकीत अनेक नाट्यमय घडामोडी घडत असतानाही विखे पाटील यांनी प्रभावी समन्वय साधत मार्ग काढला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखविलेला विश्वास त्यांनी सार्थ ठरवला. त्यामुळे राहुरी मतदारसंघात भाजपचे एक नव्हे तर दोन आमदार निवडून आले. विधानपरिषदेचे नवनिर्वाचित आमदार प्राजक्त तनपुरे आणि आमदार अक्षय कर्डिले यांनीही सार्वजनिकरित्या विखे पाटील यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली असल्याचे शेळके म्हणाले. शिर्डी औद्योगिक वसाहतीसाठी शेती महामंडळाची तब्बल ५०० एकर जमीन हस्तांतरित करून विकासाचा नवा अध्याय सुरू करण्यात आला. या ठिकाणी देशातील खासगी क्षेत्रातील पहिला तोफगोळे निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला असून केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. त्यामुळे शिर्डी मतदारसंघ राष्ट्रीय स्तरावर चर्चेत आला.



ठाणे : दिवा परिसरातील बेतवडे गावाजवळील खदानीत बुडालेल्या २० वर्षीय तरुणाचा मृतदेह शोधकार्या दरम्यान सापडला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. माहितीनुसार, मॅरेथॉन टॉवरजवळ रेल्वे ट्रॅकच्या बाजूला असलेल्या खदानीत सोमवारी रात्री सुमारे ८.३३ वाजण्याच्या सुमारास मोनू सोलंकी (२०) हा पोहण्यासाठी गेला होता. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने तो खदानीतील खोल पाण्यात बुडाला.

## थोडक्यात बातम्या...



### ठाण्यात पंतप्रधानांच्या विक्रमी कार्यकाळानिमित्त महाआरती

ठाणे (स. गांवकरी) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतंत्र भारताच्या इतिहासात सर्वाधिक काळ पंतप्रधानपद भूषविण्याचा ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केल्याच्या पार्श्वभूमीवर ठाण्यात भाजपच्या वतीने विशेष महाआरतीचे आयोजन करण्यात आले. वसंत विहार नाका येथील हनुमान मंदिरात पार पडलेल्या या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि देशाच्या सततच्या प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार व भारतीय जनता पक्ष महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस ॲड. निरंजन डावखरे यांनी मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळातील विविध कामगिरीचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, गेल्या बारा वर्षांत भारताने जागतिक स्तरावर नवी ओळख निर्माण केली असून देशाला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झाले आहे. कोरोना महामारीच्या काळात जगभरातील अनेक देश आर्थिक संकटात सापडले असताना भारताने केवळ परिस्थितीचा यशस्वी सामना केला नाही, तर जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक म्हणून स्वतःचे स्थान कायम राखले, असे डावखरे म्हणाले. तसेच सध्या जगभरात युद्धजन्य आणि अस्थिर परिस्थिती असतानाही भारत आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या स्थिर असल्याचा दावाही त्यांनी केला. "पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वामुळे भारताची जागतिक पातळीवर वेगळी ओळख निर्माण झाली आहे. पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती, संरक्षण, परराष्ट्र धोरण आणि सामाजिक कल्याण योजनांमुळे देशाचा सर्वांगीण विकास झाला आहे," असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी विरोधकांवरही अप्रत्यक्ष टीका केली. "देशाच्या प्रगतीकडे दुर्लक्ष करून काहीजण केवळ राजकीय कारणांमुळे टीका करत आहेत. मात्र विकासाची कामे जनतेसमोर स्पष्टपणे दिसत आहेत," असे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी नमूद केले. देशभरातील विविध मंदिरांमध्ये पंतप्रधानांच्या दीर्घायुष्यासाठी आरती आणि प्रार्थना करण्यात येत असल्याचे सांगत त्यांनी सर्व भारतीयांच्या सुख-समृद्धीसाठीही प्रार्थना केली.

### राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या 140 प्रतिबंधात्मक कारवाया

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने राबविलेल्या विशेष मोहिमेत 140 प्रतिबंधात्मक कारवाया करून 10 लाख 72 हजार 885 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक एस. एल. कदम यांनी दिली. पुणे-फुगेवाडी येथे मिथेनॉल मिश्रित हातभट्टी दारू सेवनामुळे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात 29 मेपासून अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम सुरू करण्यात आली. तसेच 2 जूनपासून 'हातभट्टीमुक्त नांदेड जिल्हा' मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले होते. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, सहआयुक्त आणि विभागीय उपआयुक्त यांच्या निर्देशानुसार अधीक्षक एस. एल. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील निरीक्षक, दुय्यम निरीक्षक आणि भरारी पथकांनी 29 मे ते 8 जून या कालावधीत ही कारवाई केली. या कालावधीत एकूण 140 गुन्हे नोंदविण्यात आले असून 137 वारस प्रकरणे दाखल करण्यात आली. 142 आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# श्री शिव महापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता



आळंदी : (स. गांवकरी)

अधिक मासानिमित्त आळंदी येथील स्वकुळसाळी ज्ञातीगृहात आयोजित करण्यात आलेल्या श्री शिव महापुराण कथा व अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप सोमवारी ह.भ.प. श्री. पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या काल्याच्या कीर्तनाने अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. १ जून ते ८ जून २०२६ या कालावधीत पार पडलेल्या या धार्मिक सोहळ्याला हजारो भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सप्ताहादरम्यान पहाटे काकडा आरती, विष्णुसहस्त्रनाम पठण, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम गाथा भजन, शिव महापुराण कथा, हरिकीर्तन तसेच महाप्रसाद अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दररोज पहाटेपासून रात्रीपर्यंत सुरू असलेल्या या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने भक्त उपस्थित राहत होते.

श्री शिव महापुराण कथेच्या प्रवक्त्या ह.भ.प. सौ. भागवताचार्य सोनाली दीदीजी महाजन यांनी सात दिवस अत्यंत रसाळ व ओघवत्या शैलीत कथा निरूपण केले. त्यांच्या प्रवचनासाठी ज्ञातीगृहाचे सभागृह दररोज तुडुंब भरत होते. भाविकांना बसण्यासाठीही जागा मिळणे कठीण होत होते. सायंकाळच्या हरिकीर्तन सेवेत ह.भ.प. विजय महाराज बागडे, ह.भ.प. सौ. स्वातीताई विलासराव ताटे (परळी वैजनाथ), ह.भ.प. तुकाराम महाराज ताजणे, ह.भ.प. निकम महाराज, ह.भ.प. अशोकराव हुंबे, ह.भ.प. काजलताई पोतले-काळे आणि ह.भ.प. महेशजी महाराज महाजन यांनी कीर्तन सेवा सादर केली.

सप्ताहाच्या अखेरच्या दिवशी आळंदी शहरातून भव्य प्रभातफेरी व ग्रंथदिंडी काढण्यात आली. इंद्रायणी नदीकाठ, श्री ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिर परिसरातून निघालेल्या दिंडीत समाजबांधव, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात आणि फुगड्यांच्या तालावर दिंडीने भक्तिमय वातावरण निर्माण केले.

सप्ताहात शिव-पार्वती विवाह सोहळ्याचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. वसमत येथील सखाराम आनंदराव दगडे यांनी महादेवाची तर सविता सखाराम दगडे यांनी पार्वतीची भूमिका साकारली. हा विवाह सोहळा भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला.

रविवारी शिव महापुराण कथा समाप्तीनंतर दीपोत्सव साजरा करण्यात आला. उपस्थित भक्तांच्या हातात दीप देऊन श्रीमद्भगवद्गीतेच्या १ ते १८ अध्यायांचे सामूहिक पठण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वकुळसाळी ज्ञातीगृहाचे नवनिर्वाचित अध्यक्ष अमित सूर्यकांत उगले, उपाध्यक्ष मनोहर किसनराव दिवाने, सचिव देवेन पुष्पलाल क्षीरसागर, सहसचिव दीपक बाबुराव मारवाडी, खजिनदार प्रवीण प्रभाकर जुंदरे आणि हिशोब तपासणी प्रमुख नंदकिशोर जानकीराम ढोकळे यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन स्वागत केले.

स्वकुळसाळी ज्ञातीगृहाचे माजी अध्यक्ष लायन चंद्रकांत हावरे यांनी प्रास्ताविकात सप्ताह आयोजनामागील उद्देश स्पष्ट करत समाजबांधवांनी दिलेल्या भरघोस प्रतिसादाबद्दल आभार व्यक्त केले.

सप्ताहाच्या निमित्ताने विविध मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये स्वकुळ समाचारचे संपादक ईश्वरलाल साळी, प्रदीप एकनाथ ढोरे, ह.भ.प. विजय बागडे, अरुण बारगजे, विष्णू शेकटकर, सखाराम आनंदराव दगडे आदींचा समावेश होता. दानशूर व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित असलेले डॉ. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला) यांनी सप्ताहादरम्यान सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी स्वकुळसाळी ज्ञातीगृहासाठी लिफ्ट बसवून देण्याची घोषणा केली. तसेच समाजातील गरजू घटकांना सढळ हस्ते मदत करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

सप्ताह यशस्वी करण्यासाठी विश्वस्त दिलीप विश्वनाथ जाळींद्रे, अविनाश पंढरीनाथ साळी, विलास बाबुराव सरोदे, मंगल हरीश अष्टेकर, अनिल दशरथ भागवत, महादेव बबन साळी, ॲड. स्वाती सुरेश लंगोटे, मुकुंद तुकाराम साळी, सुनील अविनाश पावले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

सल्लागार म्हणून स्वातीताई ताटे, अरुण बारगजे, विजय ढोरजे, ज्ञानेश घोडके, सुरेश इंगळे यांनी मार्गदर्शन केले. तसेच अशोक ढोरजे, लायन चंद्रकांत हावरे, उल्हास दांडेकर, अजित साळी, अशोक साळी, जयहरी साखरे, दिलीप ढोरजे, प्रदीप ढोरे, विद्यासागर बागडे आणि हरीश अष्टेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या धार्मिक सोहळ्यास महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायक ज्ञानेश्वर मेश्राम, पीसीएमसी महापौर सचिव शिवाजीराव टिळे, नगरसेवक अशोक कांबळे, ज्ञानेश्वर रायकर, मृदुल भोसले, ज्येष्ठ पत्रकार अर्जुन मेदनकर, एम. डी. पाखरे, हमीद शेख, नंदुकाका वडगांवकर, अविनाश बोरुंदिया, कृष्णा बिरादार, प्रशांत वहील, उद्योजक जयंत घोरपडे, कुरुडवाडी नगराध्यक्ष राजेंद्र पारखे, सिने दिग्दर्शक दादा शेख तसेच ज्येष्ठ पत्रकार डी. के. कुऱ्हाडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्वकुळसाळी ज्ञातीगृहाचे व्यवस्थापक राजेश कोंडीबा त्रिमले व त्यांच्या सहकाऱ्यांनी सप्ताह यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच अनेक दानशूर व्यक्ती व समाजबांधवांनी महाप्रसाद व अन्नदानासाठी उदारहस्ते देणग्या दिल्या. सप्ताहात सहभागी झालेल्या सर्व भाविकांसाठी नाश्त्यापासून महाप्रसादापर्यंत उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण सप्ताहभर आळंदी नगरीत हरिनामाचा गजर, शिवभक्तीचा उत्सव आणि अध्यात्मिक वातावरण अनुभवायला मिळाले. भक्ती, सेवा, समाजएकता आणि संस्कारांचा सुंदर संगम घडविणारा हा सप्ताह भाविकांच्या स्मरणात कायम राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## ५०० हून अधिक शासकीय सेवा उपलब्ध

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा व प्रमाणपत्रे गावपातळीवरच उपलब्ध व्हावीत, यासाठी ग्रामपंचायतींमधील आपले सरकार सेवा केंद्रे अद्ययावत करून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिले आहेत. पूर्वी या केंद्रांमध्ये मर्यादित स्वरूपातील सेवा उपलब्ध होत्या. मात्र आता महा ऑनलाईनचे सर्व अधिकार ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांना प्राप्त झाले असून महसूल विभागासह विविध विभागांच्या ५०० हून अधिक शासकीय सेवा गावपातळीवर उपलब्ध होणार आहेत. या सेवांमध्ये उत्पन्न, रहिवासी, जात, नॉन-क्रिमिलेयर, अल्पभूधारक, राष्ट्रीयत्व, जन्म, मृत्यू, विवाह प्रमाणपत्र, नमुना-८ उतारा आदी विविध दाखले व प्रमाणपत्रांचा समावेश आहे. तसेच पीक विमा, महाडीबीटीवरील अर्ज, मतदार नोंदणी, पॅन कार्ड अर्ज, आयुष्मान कार्ड, सातबारा उतारा, विविध शासकीय अनुदान योजना, वीज व पाणी बिल भरणा, बँकिंग सुविधा, शिष्यवृत्ती अर्ज, बांधकाम कामगार नोंदणी तसेच रेल्वे व बस आरक्षण आदी सेवाही या केंद्रांमार्फत उपलब्ध होणार आहेत.




## केडगावमधील ओंकार सातपुते सह चार जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




केडगाव परिसरात घडलेल्या जुन्या वादाच्या कारणावरून एका खासगी बँकेत कार्यरत असलेल्या ऑफिस बॉयला एक लाख रुपयांची मागणी करत जातीवाचक शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, निलेश साहेबराव पंचमुख (वय ३४, रा. सिंध्दाथ नगर, नवबौद्ध वस्ती, अहिल्यानगर) हे आयसीआयसीआय बँकेच्या केडगाव शाखेत कंत्राटी पद्धतीने ऑफिस बॉय म्हणून कार्यरत आहेत. २६ मे २०२६ रोजी बँकेच्या कामानिमित्त ते झेंडा चौक, केडगाव येथे गेले असता त्यांच्या पाठीमागून ट्रिपल सीट आलेल्या दुचाकीस्वारांची गाडी घसरून पडली. त्यानंतर संबंधितांनी पंचमुख यांना अडवून शिवीगाळ व मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच त्यांना एका शाळेच्या परिसरात नेऊन पुन्हा मारहाण करण्यात आली. यावेळी त्यांचा मोबाईल फोन, खिशातील रोख रक्कम व त्यांच्या ताब्यातील दुचाकी घेऊन गेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. नंतर बँक व्यवस्थापकांच्या मध्यस्थीने संबंधितांनी मोबाईल, पैसे व दुचाकी परत केल्याने त्यावेळी कोणतीही तक्रार करण्यात आली नव्हती.

मात्र, ९ जून २०२६ रोजी सायंकाळी केडगाव येथील एका कार्यालयात बोलावून घेतल्यानंतर ओंकार दिलीप सातपुते, ओम किरण बारवकर, अभय कारखेले, अनिकेत शिर्के तसेच अन्य दोन जणांनी जुन्या घटनेचा संदर्भ देत मोबाईल फुटल्याची भरपाई म्हणून एक लाख रुपयांची मागणी केली, असा आरोप पंचमुख यांनी केला आहे. पैसे देण्यास असमर्थता दर्शविल्यानंतर संबंधितांनी जातीवाचक शिवीगाळ करून अपमानित केले तसेच "कामावर येऊ देणार नाही, हात-पाय तोडून टाकू" अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी निलेश पंचमुख यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# ठेकेदार-प्रशासन संघर्षाचा फटका नागरिकांना

**खोडद : (स. गांवकरी)**

जुन्नर आणि पारनेर तालुक्यांना जोडणाऱ्या बेल्हे–कळस मार्गावरील गंगाधर ओढ्यावर नवीन पूल उभारण्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. पुलासाठी जुना साकव पाडण्यात आल्याने मुख्य मार्ग बंद झाला असून परिसरातील ग्रामस्थ, शेतकरी, विद्यार्थी आणि वाहनचालकांना मोठा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. आमदार शरददादा सोनवणे यांच्या विशेष प्रयत्नातून महाराष्ट्र शासन आणि पुणे जिल्हा परिषदेमार्फत या पुलासाठी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असला, तरी कार्यारंभ आदेश मिळून चार महिने उलटूनही काम अर्धवट अवस्थेत असल्याने पावसाळ्याच्या तोंडावर ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांच्या



मते, पुलाच्या कामासाठी जुन्या साकवाचे बांधकाम करण्यात आले. मात्र त्यानंतर कामाला अपेक्षित गती मिळाली नाही. ठेकेदार आणि प्रशासन यांच्यातील समन्वयाचा अभाव, तांत्रिक अडचणी आणि विविध परवानग्यांमुळे काम रखडल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. या वादाचा फटका मात्र सर्वसामान्य नागरिकांना बसत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. सध्या घटनास्थळी मोठे खड्डे पडले असून त्यामध्ये घाण पाणी साचले आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर अनेक गावांचा संपर्क तुटण्याची भीती व्यक्त केली जात आहे .एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार ? असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित करण्यात येत आहे. संबंधित विकासकाम रखडल्याच्या कारणांवरून ठेकेदार आणि प्रशासन यांच्यात मतभेद उघड झाले आहेत. ठेकेदार संदीप बांगर यांनी प्रशासनाच्या दिरंगाईमुळे काम थांबले असल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, डिसेंबर २०२५ मध्ये कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतरही कामासाठी आवश्यक असलेले 'लाइन आऊट' आणि माहिती फलकाचा मजकूर वेळेत उपलब्ध करून देण्यात आला नाही. याबाबत प्रशासनाला तब्बल ४० पत्रे देऊनही कोणतीही दखल घेण्यात आली नसल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच प्रशासकीय विलंब आणि राजकीय दबावामुळे कामाच्या गतीवर परिणाम झाल्याचेही त्यांनी सांगितले. दुसरीकडे, शाखा अभियंता रवींद्र होडगे यांनी या आरोपांचे खंडन करत कामाला झालेल्या विलंबामागे इतर कारणे असल्याचे स्पष्ट केले. कामासाठी नियुक्त करण्यात आलेले मजूर पश्चिम बंगालला परत गेल्याने तसेच आचारसंहितेच्या कालावधीमुळे कामाच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित पुलाचे काम पुन्हा सुरू झाल्याचा दावा रवींद्र होडगे यांनी केला असला, तरी कामाच्या विलंबामुळे परिसरातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पुलासाठी असलेला जुना साकव आधीच पाडण्यात आल्याने हा मुख्य मार्ग पूर्णपणे बंद झाला आहे.

या मार्गाच्या बंदीमुळे वाहनचालक, शेतकरी तसेच कोरठण खंडोबा देवस्थानाकडे जाणाऱ्या भाविकांना अनेक किलोमीटरचा वळसा घालून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या मते, आवश्यक यंत्रसामग्री आणि मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्यास हे काम अल्पावधीत पूर्ण होऊ शकते. दोन पोकलेन यंत्रांच्या सहाय्याने अवघ्या दहा दिवसांत काम पूर्ण करण्याची शक्यता असल्याचेही काही नागरिकांनी सांगितले.

दरम्यान, ठेकेदाराने पूर्वपरवानगी न घेता रस्ता खोदल्याचा आरोप करत बेल्हे ग्रामपंचायतीने या प्रकरणापासून स्वतःला दूर ठेवण्याची भूमिका घेतली आहे. जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या ७५ लाखांच्या पुलासंदर्भातील सुरू असलेले गौडबंगाल तातडीने थांबवून काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, अशी जोरदार मागणी बेल्हे परिसरातील नागरिकांनी केली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जि. प. पुणे येथे कलाकार मानधन समस्या सुटल्याने कलाकार समाधानी

खोडद (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासनाच्या योजनेतून राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत कलाकार मानधन योजना अनेक वर्षापासून कार्यरत आहे . यापूर्वी मानधन मिळवण्यासाठी कलाकारांना पंचायत समितीच्या समाज कल्याणच्या विभागात जाऊन फाईल जमा करावा लागत होती. परंतु आता शासनाने ऑनलाईन पद्धत केल्याने प्रत्येक तालुक्याच्या पंचायत समितीमध्ये या कलाकार मानधनाविषयीची स्पष्टपणे माहिती मिळत नाही. किंवा मार्गदर्शन मिळत नाही. अशा तक्रारी अनेक कलाकारांनी तमाशा कलेचे अभ्यासक प्रा. काशिनाथ आल्हाट यांच्याकडे केल्या होत्या. अनेक कलाकारांच्या समस्या जाणून घेऊन पुणे येथील समाज कल्याण विभागातील गणेश ओव्हाळ साहेब यांच्याकडे त्या मांडण्यात आल्या.ज्या कलाकारांच्या समस्या आहेत अशा कलाकारांना आवाहन करून पुणे येथे बोलवण्यात आले. अनेक कलावंतांच्या वारस नोंद, बँक खाते, आधार लिंक, मानधन यादीत नाव नसलेल्या यासारख्या समस्या घेऊन कलावंत उपस्थित होते . त्या सर्वांच्या समस्या ऐकून या विभागाचे अधिकारी गणेश ओव्हाळ साहेबांनी सर्वांच्या समस्या सोडवण्याचे काम केले.त्यांच्यासह हृदय वर्तनाने कलाकार समाधानी झाले. यामध्ये जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे व शिवसेना नेते रोहिदास गोरडे यांचे उत्तम सहकार्य लाभले.




### सात वर्षांच्या न्यायालयीन लढाईनंतर दोन शेतकऱ्यांची निर्दोष मुक्तता

नेवासा (स. गांवकरी) : पाटबंधारे विभागाच्या कर्मचाऱ्याने दाखल केलेल्या गुन्ह्यात तब्बल सात वर्षांच्या न्यायालयीन लढाईनंतर शेतकरी अंबादास साहेबराव शिरसाठ व राजेंद्र भीमराज गव्हाणे यांची मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय, नेवासा यांनी निर्दोष मुक्तता केली. नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. I-176/2019 अंतर्गत भा.दं.वि. कलम 353, 332, 323, 504, 506 सह 34 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. शेतातील पाटाच्या पाण्याच्या वादातून हे प्रकरण घडल्याचा आरोप होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर दोन्ही शेतकऱ्यांना अटक करण्यात आली होती व काही काळ कारागृहातही राहावे लागले होते.सदर प्रकरणाची सुनावणी मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री. वाघमारे यांच्या न्यायालयात झाली. सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेल्या पुराव्यांचे व साक्षीदारांच्या जबाबांचे परीक्षण केल्यानंतर आरोपींविरुद्धचे आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध होत नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे न्यायालयाने दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात अंबादास शिरसाठ यांच्या वतीने ॲड. पांडुरंग औताडे यांनी कामकाज पाहिले. त्यांना कमलेश नवले पाटील यांनी सहकार्य केले. तर राजेंद्र गव्हाणे यांच्या वतीने ॲड. एन. एस. जोशी यांनी बाजू मांडली.तब्बल सात वर्षे न्यायालयीन प्रक्रियेला सामोरे जावे लागलेल्या शेतकरी कुटुंबांना या निकालामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. "शेतीसाठी पाणी मिळविण्याच्या संघर्षातून शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल होणे दुर्दैवी आहे. या प्रकरणातील शेतकऱ्यांना सात वर्षे न्यायालयीन लढा द्यावा लागला. अखेर मा. न्यायालयाने पुराव्यांचे योग्य मूल्यमापन करून त्यांना न्याय दिला. हा निकाल न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करणारा आहे."

### वादळग्रस्त केळी उत्पादक शेतकऱ्यांना १०० टक्के नुकसानभरपाई द्या

रावेर (स. गांवकरी) : रावेर विधानसभा मतदारसंघातील रावेर व यावल तालुक्यात १ जून २०२६ रोजी आलेल्या जोरदार वादळामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना १०० टक्के नुकसानभरपाई व सरसकट आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी आमदार अमोल जावळे यांनी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि मदत व पुनर्वसन मंत्री ना.मकरंद जाधव-पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.वादळामुळे अनेक शेतकऱ्यांच्या केळी बागा जमीनदोस्त झाल्या असून, लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. केळी हे या भागातील प्रमुख नगदी पीक असल्याने , शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून नुकसानाची अचूक नोंद घ्यावी तसेच शासनाने विशेष बाब म्हणून १०० टक्के नुकसानभरपाई मंजूर करावी, अशी मागणी आमदार जावळे यांनी केली आहे. यासंदर्भात आमदार अमोल जावळे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा कृषी क्षेत्राशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही स्वतंत्र निवेदन सादर करून रावेर-यावल परिसरातील शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याची मागणी केली आहे. शेतकऱ्यांना संकटाच्या काळात शासनाची भक्कम साथ मिळावी आणि नुकसानग्रस्तांना त्वरित आर्थिक मदत मिळावी, यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आमदार जावळे यांनी व्यक्त केली आहे.

### पेट्रोल-डिझेल दरवाढीविरोधात काँग्रेसने दंड थोपटला

कनाशी (स. गांवकरी) : पेट्रोल-डिझेलच्या दरवाढीने जनता मेटाकुटीला आली. आज काँग्रेसने सह महाविकास आघाडीने थेट आक्रमक पवित्रा घेतला. यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी तहसील प्रांत कार्यालयाच्या पायऱ्यांवर घोषणा देत आंदोलन छेडले. मागील ११ दिवसांत पेट्रोल-डिझेल ८ रुपयांनी महागले. १२ वर्षांत पेट्रोल ३८% तर डिझेल ६२% वाढले. मनमोहन सिंग यांच्या काळात क्रूड १०० डॉलर असतानाही पेट्रोल ७० रुपयांच्या आत होते. आज क्रूड ५० डॉलरवर असूनही पेट्रोल १०० पार गेले. हा सरकारचा जनतेच्या खिशावर दरोडा आहे. केंद्र सरकारने १२ वर्षांत पेट्रोलियम करातून ४३ लाख कोटी वसूल केले. फक्त ४ वर्षांत ३ तेल कंपन्यांनी २१, ८०० कोटी कमावले. पण शेतकऱ्याला डिझेल परवडत नाही. पंपावर इंधन मिळत नाही. शेतीची कामे ठप्प झाली. अन्नधान्य उत्पादन घटणार. महागाई आणखी भडकणार. यावेळी महाविकास आघाडीचे पदाधिकारी काँग्रेस सेल जिल्हाध्यक्ष राम चौरे, अतुल पगार, संतोष भोये, नरेंद्र भावसार, राष्ट्रवादी शरद पवार , गटाचे जेष्ठ सेल जिल्हाध्यक्ष रामा पाटील आदिवासी सेलचे पदाधिकारी माजी जिल्हा प्रमुख कारभारी आहेर अंबादास जाधव उबाठा गट यांच्यासह शेकडो कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. भाववाढ मागे घ्या च्या घोषणांनी प्रांत कार्यालय दणाणून गेले. ही दरवाढ तात्काळ थांबलिच पाहिजे. शेतकरी मरतोय, सामान्य माणूस पिचतोय. सरकारने डोळे उघडावेत.

## डिंभे धरणावर नव्या कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण संपन्न

**खोडद : (स. गांवकरी)**

कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक १, नारायणगाव अंतर्गत नवनियुक्त कर्मचाऱ्यांसाठी नुकतेच एका विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये कालवा निरीक्षक, मोजणीदार आणि दप्तर कारकून या पदांवर नियुक्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा समावेश होता.प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून या कर्मचाऱ्यांनी हुतात्मा बाबू गेनू जलाशय , डिंभे धरण येथे प्रत्यक्ष भेट दिली. नारायणगाव येथे कुकडी पाटबंधारे विभाग क्रमांक १ अंतर्गत कार्यकारी अभियंता गणेश नन्नोर यांच्या मार्गदर्शनाखाली नवयुक्त कार्यरत दप्तर कारकुर ,कालवा निरीक्षक व मोजणीदार यांचे सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण चालू आहे . यावेळी माजी विभागीय अधिकारी सुहास साळवे आणि शाखाधिकारी अक्षय सुरवसे यांनी कर्मचाऱ्यांना डिंभे धरण बांधण्यामागचा



उद्देश,धरणाची रचना, पाणी साठवण्याची क्षमता, वीजनिर्मिती ,पॉवर हाऊस, कालावधी , बांधकाम पद्धत,ओलिताखालील सिंचन क्षेत्र आणि सांडव्यावरून पाणी सोडण्याची तांत्रिक पद्धत याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. आंबेगाव तालुक्यातील पश्चिम पट्ट्यातील डिंभे धरण हे पुणे ,अहिल्यानगर ,सोलापूर या तीन जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी जीवन वाहिनी बनले आहे. पुणे ,अहिल्यानगर, सोलापूर या तीन जिल्ह्यातील शेती सिंचनासाठी डिंभे धरणाच्या पाण्याचे मोठे महत्त्व आहे. त्यामुळे या धरणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, असे सुहास साळवे यांनी प्रशिक्षणार्थींना धरणाविषयी माहिती देताना सांगितले.

## हेल्थ ई-बुकबद्दल डॉ. यशवंत पवार यांचा सत्कार

**नेवासा : (स. गांवकरी)**

कन्नड येथील ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ व आरोग्य जनजागृती कार्यकर्ते डॉ. यशवंत पवार यांच्या "वनस्पती तेल आणि तुपाचे सत्य" या हेल्थ ई-बुकचे अमेरिकेतून ऑनलाईन प्रकाशन झाल्याबद्दल अ.नगर जिल्ह्यातील शिंगणापूर-सोनई येथे मेक अँड ग्रोथ कन्सल्टन्सी संस्थेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना ई-बुकचे लेखक डॉ. यशवंत पवार म्हणाले की, "गेल्या 40 वर्षांच्या वैद्यकीय अनुभवात अन्नातील भेसळ, विशेषतः तेल व तुपातील भेसळीमुळे बीपी, मधुमेह, कर्करोग यांसारख्या जीवनशैलीजन्य आजारांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याचे दिसून आले आहे.



याबाबत जनजागृती व्हावी आणि नागरिकांनी योग्य माहितीच्या आधारे आरोग्यदायी पर्याय निवडावेत या उद्देशाने 'वनस्पती तेल आणि तुपाचे सत्य' या ई-बुकची निर्मिती करण्यात आली आहे. तेल आणि तुपाविषयी योग्य माहिती समाजापर्यंत पोहोचल्यास अनेक आजारांवर प्रतिबंध घालण्यास मदत होऊ शकते."

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरोग्य क्षेत्रात कार्यरत मेक अँड ग्रोथ कन्सल्टन्सी इंडिया संस्थेचे सिईओ श्री मुकुंद वाकळे होते. तर प्रमुख पाहुणे विशाल टोणपे हे होते. यावेळी बोलताना मुकुंद वाकळे म्हणाले की, "डॉ. पवार यांचे कार्य आरोग्य क्षेत्रात जनजागृतीसाठी दिशादर्शक ठरू शकते. नागरिकांमध्ये शुद्ध अन्नपदार्थ, कोल्ड प्रेस तेल आणि शुद्ध गिर गायीचे तूप याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आम्ही त्यांच्या कार्यास पूर्ण सहकार्य करू. अशा उपक्रमांमुळे अनेक आरोग्य समस्यांवर प्रतिबंध घालण्यास मदत होईल."या वेळी यांचाही सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास शिंगणापूर, सोनई, नेवासा परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी शिकारे यांनी केले तर शेवटी पत्रकार बाळासाहेब पंडित (नेवासा फाटा) यांनी आभार मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सर्व पदाधिकारी रामेश्वर शिंदे, अष्पाक शेख, अनिल सोनवणे, सागर कुंभकर्ण, पंडित मॅडम, यांनी विशेष परिश्रम घेतले.

## खंडोबारायांची सासुरवाडी नेवासा येथून जेजुरीच्या खंडेरायांना पत्रिका अर्पण करून धोंडयाचे निमंत्रण

**नेवासा : (स. गांवकरी)**

नेवासा बुद्रुक ही लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या खंडोबारायांची सासुरवाडी असल्याने अधिक पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने धोंडा भोजनाचे निमंत्रण खंडोबारायांना जेजुरी येथे जाऊन देण्यात आले. शनिवारी दि.१३ जून रोजी नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई मंदिर प्रांगणात धोंडा भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री खंडोबादेवा आपण पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने म्हाळसा माहेर व आपली सासुरवाडी असलेल्या नेवासा बुद्रुक येथे धोंडा भोजनास यावे अशा आशयाचा मजकूर छापलेली पत्रिका नेवासा बुद्रुक येथील पुरातन म्हाळसा खंडोबा बानाई मंदिर जीर्णोद्धार समितीचे अध्यक्ष संभाजीराव ठाणगे,विश्वस्त राजेंद्र काशीद,पुरातन देवस्थान प्रसिद्धी प्रमुख पत्रकार सुधीर



चव्हाण यांच्या हस्ते जेजुरी येथे जाऊन खंडेरायांच्या चरणी अर्पण करण्यात आली. निमंत्रण पत्रिका अर्पण करतेवेळी श्री खंडोबारायांच्या मूर्तीचे वेदमंत्राच्या जयघोषात पूजन करण्यात आले. पुजारी निलेश बारभाई यांनी पूजेचे पौरोहित्य केले.यावेळी श्री मार्तंड देवस्थान जेजुरी पालखी सोहळा समितीचे अध्यक्ष जालिंदर खोमणे,पालखी मानकरी, सोमनाथ शेवाळे,देवस्थान कर्मचारी कल्याण चव्हाण, महेश शिंदे उपस्थित होते.यावेळी देवस्थान विश्वस्त मंडळासह प्रशासकीय अधिकारी यांना ही निमंत्रण पत्रिका देण्यात आल्या. नेवासा बुद्रुक हे खंडोबारायांची पत्नी म्हाळसादेवी यांचे माहेर घर असल्याने जावई या नात्याने परंपरेनुसार खंडोबारायांना म्हाळसा माहेर असलेल्या नेवासा बुद्रुक येथून धोंडा जेवणाचे निमंत्रण तीन वर्षातून एकदा येणाऱ्या अधिक मासाच्या निमित्ताने देण्यात येते. धोंडा कार्यक्रमाच्या निमित्ताने संत महंतांसह येथील विवाहबद्ध झालेल्या लेकी जावयांना ही निमंत्रण देण्यात आले असून शनिवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास होणाऱ्या धोंडा कार्यक्रमाला ग्रामस्थांसह पंचक्रोशीतील भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन पुरातन म्हाळसा खंडोबा बाणाई जीर्णोद्धार कमिटीचे अध्यक्ष संभाजीराव ठाणगे यांनी केले आहे.

खंडोबारायांची सासुरवाडी असलेल्या नेवासा बुद्रुक येथे परंपरेनुसार चंपाषष्ठी उत्सव देखील मोठ्या थाटात साजरा केला जातो.चंपाषष्ठीला खंडोबादेव सासुरवाडीला जेवण्यासाठी येतात आणि त्यांना प्रिय असलेली वांग्याचे भरीत व बाजरीची भाकरी खातात ही भाविकांची धारणा असल्याने दरवर्षी हा उत्सव खंडोबारायांच्या सासुरवाडीत उत्साहात साजरा केला जातो,देवांचे आगमन म्हणून पालखीतून शोभायात्रा मिरवणूक काढली जाते.वाहन म्हणून घोडयाची पूजा मिरवणूक काढून केली जाते.

## अनुकंपा तत्वावर १४ उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण

**ठाणे : (स. गांवकरी)**

शासकीय सेवेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक व सामाजिक आधार मिळावा या उद्देशाने अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची शासनाची योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत जिल्हा परिषद ठाणे येथे अनुकंपा प्रतीक्षा यादीतील पात्र उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक पात्रता व ज्येष्ठतेनुसार गट (क) व गट (ड) संवर्गात नियुक्ती देण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, आज दि. ०९ जून, २०२६ रोजी जिल्हा परिषद मुख्यालयातील सभागृहात आयोजित कार्यक्रमात १४ उमेदवारांना नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते निवड झालेल्या उमेदवारांना गट (क) व गट (ड) पदावरील नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आले. यावेळी नियुक्ती प्राप्त उमेदवारांचे अभिनंदन करताना त्यांनी सर्वांना प्रामाणिकपणे व जबाबदारीने कार्य करण्याचे आवाहन केले. अनुकंपा नियुक्तीसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची नियमानुसार छाननी करून अंतिम प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर ज्येष्ठता व शैक्षणिक पात्रतेच्या आधारे उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल पडताळणी करण्यात आली. निवड यादी प्रसिद्ध केल्यानंतर प्राप्त हरकतींचे नियमानुसार निराकरण करून अंतिम निवड यादी जाहीर करण्यात आली. त्यानुसार उपलब्ध रिक्त पदांवर गट (क) व गट (ड) संवर्गामध्ये १४ पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली आहे. या प्रसंगी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले, "अनुकंपा नियुक्ती ही केवळ नोकरी देण्याची प्रक्रिया नसून, कठीण परिस्थितीत सापडलेल्या कुटुंबाला आधार देण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे.

## अधिकाऱ्यांनी सदाचार, संवेदनशीलता आणि समर्पण वृत्तीचा स्वीकार करावा

**पोलिस महासंचालक सदानंद दाते**

**महाराष्ट्र पोलिस अकादमीत ५८३ उपनिरीक्षकांचा दीक्षांत सोहळा**



**नाशिक : (स. गांवकरी)**

पोलिस सेवेत येणाऱ्या अधिकाऱ्यांनी सदाचार, संवेदनशीलता आणि समर्पण ही त्रिसुत्री अंगीकारत कायद्याचे रक्षक आणि समाजाचे संवेदनशील सेवक व्हावे, असे आवाहन राज्याचे पोलिस महासंचालक सदानंद दाते यांनी केले. महाराष्ट्र पोलिस अकादमीत प्रशिक्षणार्थी पोलिस उपनिरीक्षक सत्र क्रमांक १२७ चा दीक्षांत संचलन सोहळा झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ४२० पुरुष (गोवा राज्यातील एक प्रशिक्षणार्थीसह) व १६३ महिला असे एकूण ५८३ प्रशिक्षणार्थ्यांनी १२ महिने कालावधीचे मूलभूत प्रशिक्षण पूर्ण करून महाराष्ट्र पोलिस दलात दाखल झाले. अकादमीचे संचालक नवल बजाज उपस्थित होते. त्यांनी पोलिस दलात दाखल होणाऱ्या अधिकाऱ्यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. यावेळी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विशेष पोलिस महानिरीक्षक संजय ऐनपुरे, पोलिस अधीक्षक डॉ. डी. एस. स्वामी उपस्थित होते.

पोलिस महासंचालक श्री. दाते म्हणाले की, गडचिरोलीसारख्या नक्षलग्रस्त भागात पोलिसांनी मोठे यश मिळविले आहे. आता तेथील जनतेच्या मनात सुरक्षेबरोबरच सेवेची भावना रुजविण्याचे महत्वपूर्ण परिवर्तन घडवून आणावयाचे आहे. गुन्हेगारीचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत आहे. सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. या आव्हांनाना सामोरे जाण्यासाठी पोलिसांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम होणे काळाची गरज आहे. अमली पदार्थांच्या प्रतिबंधासाठी तरुण अधिकाऱ्यांनी कठोर कारवाई करावी. कनिष्ठ कर्मचाऱ्यांचे प्रसंगावधान आणि समस्या सोडविण्याची क्षमता ही पदापेक्षा अधिक महत्वाची ठरते. त्यामुळे अधिकाऱ्यांनी सांघिक भावनेने काम करावे. पोलिस दलाची खरी ताकद जनतेचा पोलिसांवरील विश्वासात असते. नागरिक पोलिस ठाण्यात कायदेशीर मदतीबरोबरच न्याय आणि सुरक्षितता शोधत येतात. त्यामुळे अधिकाऱ्यांनी कायद्याचे रक्षक आणि समाजाचे संवेदनशील सेवक बनावे. प्रत्येक पोलिस हा गणवेशातील नागरिक असून नागरिक हा गणवेश नसलेला पोलिस आहे ही भावना समाजामध्ये रुजवावी, असे आवाहनही पोलिस महासंचालक श्री. दाते यांनी केले.

पारितोषिक विजेते प्रशिक्षणार्थी

रिव्हॉल्व्हर ऑफ ऑनर, कै. यशवंतराव चव्हाण सुवर्ण करंडक (सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी), अहिल्याबाई होळकर करंडक (सर्वोत्कृष्ट महिला प्रशिक्षणार्थी) : उत्कर्षा शशिकांत जाधव.

द्वितीय सर्वोत्कृष्ट प्रशिक्षणार्थी : मोहन चमाबाई मच्छिंद्र पालमपल्ली.

कायदा विषयात सर्वोत्कृष्ट (डॉ. बी. आर. आंबेडकर करंडक) : अमृता माया सुभाष जाधव.

सर्वोत्कृष्ट नेमबाज (एन. एम. कामटे सुवर्ण करंडक) : राजू जया दत्तात्रय जाधव.

सर्वोत्कृष्ट कवायत : बळिराम धोंडूबाई मानेजी बुडसे

सर्वोत्कृष्ट अभ्यास (सिल्व्हर बॅटन) : वैशाली सविता अर्जुन शेळके

दीक्षांत सोहळ्यासाठी सहसंचालक नंदकुमार ठाकूर, उपसंचालक (बाह्य वर्ग) प्रशांत खैरे, उपसंचालक (प्रशिक्षण) गीता चव्हाण, उपसंचालक (सेवांतर्गत प्रशिक्षण) महेश चिमटे, उपसंचालक (आयटी व सुरक्षा) पद्मजा चव्हाण-बढे यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# मंगेश बेकारसेवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

## अन्यथा जिल्हाभर जेलभरो : पारनेर तालुक्यामध्ये पुरोगामी चळवळीतील समविचारी संघटनांचा विराट जन आक्रोश मोर्चा

पारनेर : (स. गांवकरी)

देशभरात वाढती महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार, शेतकरी आत्महत्या आणि महिलांवरील अत्याचारांच्या घटनांनी जनता त्रस्त असतानाच, दुसरीकडे सामाजिक सलोखा बिघडवण्याचे आणि महापुरुषांचा अवमान करण्याचे प्रकार वाढले आहेत. या विघातक प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी आणि संवैधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी पारनेरमध्ये आज एका भव्य 'जन आक्रोश मोर्चा'चे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चाद्वारे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधत कठोर कायदेशीर कारवाईची मागणी करण्याचे निवेदन पुरोगामी चळवळीतील संघटनाच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक नितीन खंडागळे यांच्याकडे देण्यात आले.



सध्या देशात जाती-धर्माच्या नावाखाली प्रक्षोभक वक्तव्ये करून समाजात फूट पाडण्याचे षड्यंत्र रचले जात आहे. बहुजन महापुरुषांची जाणीवपूर्वक बदनामी केली जात असून, अशा प्रकरणांत पोलीस प्रशासनाकडून दाखवल्या जाणाऱ्या उदासीनतेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या प्रवृत्तींना वेळीच पायबंद घालण्यासाठी लोकशाही मार्गाने हा मोर्चा काढण्यात आला यावेळी बोलताना करंदीकर म्हणाले की, पारनेर पोलीस प्रशासनाने महापुरुषांची बदनामी करणाऱ्या मंगेश बेकारसे यांच्यावर कठोर कारवाई न करता त्याला सोडून दिले आहे.त्यामुळे सोमवार १५ तारखेपर्यंत मंगेश बेकारसे यांच्यावर महापुरुषांचा अवमान केल्याबद्दल देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला नाही तर संपूर्ण जिल्ह्यात पुरोगामी चळवळीतील पक्ष व संघटना जेलभरो करणार असल्याचे राजेंद्र करंदीकर यांनी सांगितले. यावेळी प्रशासनाला दिलेल्या प्रमुख मागण्यांकडे लक्ष वेधण्यात आले. त्या पुढीलप्रमाणे या जन आक्रोश मोर्चाच्या माध्यमातून प्रशासनाकडे खालील प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या.विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल सोशल मीडियावर आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करून अपमान करणाऱ्या मंगेश बेकारसे याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्याची वैद्यकीय सनद रद्द करण्यात यावी. तसेच, छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता ज्योतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करणाऱ्या धीरेंद्र शास्त्री, मनोहर कुलकर्णी (भिडे) आणि अनिल मिश्रा यांसारख्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.आंदोलनकर्त्या कार्यकर्त्यांवर जाणीवपूर्वक खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रयत्न थांबवावेत. मंगेश बेकारसे आणि त्याचे समर्थक स्वसंरक्षणार्थ आंदोलनकर्त्यांना लक्ष्य करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दलित-आदिवासींवरील अन्याय-अत्याचाराच्या प्रकरणांत हस्तक्षेप करून आपला वैयक्तिक स्वार्थ साधणाऱ्या समाजविघातक दलालांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी.

पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातून येणाऱ्या शोषित-पीडित नागरिकांची पोलीस कर्मचाऱ्यांकडून होणारी पिळवणूक आणि शोषण तत्काळ थांबवावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.या मागण्यांचे निवेदन पोलीस महानिरीक्षक (महाराष्ट्र राज्य) यांच्या नावे पारनेर पोलीस स्टेशनला देण्यात आले. या निवेदनाच्या प्रती पोलीस अधीक्षक, जिल्हा अहमदनगर यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. सामाजिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी आणि संविधानाचा आदर राखण्यासाठी प्रशासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी आग्रही मागणी यावेळी आंदोलकांनी केली.

## थोडक्यात पण महत्वाचे



### फसव्या कर्जमाफीविरोधात पारनेरमध्ये सर्वपक्षीयांची वज्रमूठ

पारनेर (स. गांवकरी) : फडणवीस सरकारने कर्जमाफीसाठी काढलेला शासन आदेश फसवा आहे. कर्जमाफी आदेशात अत्यंत जाचक अटी शर्ती लागू करण्यात आल्या आहेत. राज्यातील ५ टक्केच शेतकऱ्यांना या कर्जमाफीचा फायदा होणार असून उर्वरित ९५ टक्के शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार आहे. फडणवीस सरकारने केलेली ही कर्जमाफी फसवी असून या विरोधात पारनेर तालुक्यातील भूमिपुत्र शेतकरी संघटना, शिवबा संघटना, निलेश लंके प्रतिष्ठान, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, उद्धव ठाकरे गट, शिवसेना, संभाजी ब्रिगेड, भाजप, राष्ट्रवादी, मनसे, युवा सेना, शेतकरी सेना, कॉंग्रेस, शरद पवार गट, आमची माती आमची माणस या सर्वपक्षीय व संघटना एकत्रित येत दि. १० जून रोजी प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृहात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत फडणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याने भव्य आंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला आहे. तहसील कार्यालयावर लवकरच निषेध मोर्चा काढून शासन निर्णयाची सर्वपक्षीय व संघटनांच्या वतीने जाहीर होळी करण्यात येईल. तसेच त्यानंतर खासदार निलेश लंके व आमदार काशिनाथ दाते यांना निवेदन देण्यात येईल. शासनाच्या कर्जमाफीतील समितीच्या एका प्रमुखाशी मंत्रालयात बैठक लावण्यासाठी आमदार काशिनाथ दाते यांना आग्रह धरणार असल्याचे या सर्वपक्षीय बैठकीत ठरले. फसव्या कर्जमाफीच्या विरोधात पारनेर तालुक्यातील सर्व पक्षीय व संघटना एकत्रित आल्याने पुढील काळात मोठं जन आंदोलन पेटणार असल्याची चिन्हे दिसत आहेत. या बैठकीत सर्वपक्षीय नेत्यांनी आप आपले झेंडे बाजूला सारून थेट शेतकऱ्यांच्या हितासाठी एकत्र येत वज्रमूठ दाखवली आहे.

### भट्टड हॉस्पिटल व मॅंगो इंटरनॅशनल प्री स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिर



श्रीगोंदा (स. गांवकरी) : दौंड येथील भट्टड हॉस्पिटल आणि मॅंगो इंटरनॅशनल प्री स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ते १० वर्षे वयोगटातील मुलांसाठी मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात एकूण ७५ मुलांची नेत्रतपासणी करण्यात आली. यावेळी सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रेमकुमार भट्टड यांचे सुपुत्र डॉ. चिराग भट्टड यांनी मुलांच्या डोळ्यांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "हे सुंदर जग अनुभवण्यासाठी डोळे हा अत्यंत महत्त्वाचा अवयव आहे. मुलांच्या प्रत्येक हालचालीवर पालक लक्ष ठेवतात, मात्र त्यांच्या दृष्टीमध्ये काही समस्या आहेत का, हे बालपणातच ओळखणे आवश्यक आहे. त्यासाठीच या शिबिराचे आयोजन करण्यात आले." शिबिरादरम्यान तपासणी केलेल्या मुलांपैकी ३० मुलांना चष्म्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. तसेच ज्या मुलांना रेटिना तपासणीची गरज आहे, त्यांना वेळ देऊन दौंड येथील भट्टड हॉस्पिटलमध्ये मोफत तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती डॉ. चिराग भट्टड यांनी दिली. दौंड येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रेमकुमार भट्टड यांनी वैद्यकीय व्यवसायासोबतच सामाजिक कार्य, नेत्रदान चळवळ, मोफत नेत्रतपासणी शिबिरे तसेच पंढरपूर वारीतील वारकऱ्यांची मोफत नेत्रतपासणी यांसारख्या उपक्रमांत उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत डॉ. चिराग भट्टड हेही सामाजिक बांधिलकी जपत हा सेवाव्रताचा वारसा पुढे नेत आहेत. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

### राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम सुरू!




मुरबाड (स. गांवकरी) : मुरबाड तालुक्यातील मुरबाड ते सरळगाव तसेच पुढील राष्ट्रीय महामार्गावरील धोकादायक खड्डे तात्काळ बुजविण्याची मागणी ठाणे जिल्हा एकता मंचच्या वतीने करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने खड्डे बुजविण्याच्या कामास सुरुवात केली आहे. गेल्या आठवड्यात ठाणे जिल्हा एकता मंचचे संस्थापक अब्बासभाई शेख आणि कल्याण ग्रामीण अध्यक्ष भरत दळवी यांनी राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाला निवेदन देऊन रस्त्यांची दुरवस्था दूर करण्याची मागणी केली होती. त्यानंतर प्रशासनाने तत्काळ कार्यवाही करत मुरबाड परिसरातील महामार्गावरील खड्डे बुजविण्याचे काम हाती घेतले. या कार्यवाहीबद्दल ठाणे जिल्हा एकता मंचच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात आले. महामार्गावर खड्डे राहू नयेत, वाहनचालकांना सुरक्षित व सुरळीत प्रवास करता यावा तसेच अपघात टाळता यावेत यासाठी मंच सातत्याने प्रयत्नशील असल्याचे भरत दळवी यांनी सांगितले.



### खेडलेमार्गे कांदळीला जाणारी रात्रीची बससेवा लवकरच सुरू होणार!

मुरबाड (स. गांवकरी) : मुरबाड तालुक्यातील खेडलेमार्गे कांदळी गावाकडे जाणारी रात्रीची बससेवा गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत होती. ही बससेवा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी मागणी भरत दळवी युवा विकास मंच मुरबाड विधानसभा आणि ठाणे जिल्हा एकता मंच यांच्या वतीने करण्यात आली होती. यासंदर्भात मुरबाड बस आगार प्रशासनाला निवेदन देण्यात आले असून, प्रशासनाने या मागणीची सकारात्मक दखल घेत लवकरच खेडलेमार्गे कांदळी जाणारी रात्रीची बससेवा पुन्हा सुरू करण्यात येणार असल्याचे आश्वासन दिले आहे. ही बससेवा सुरू झाल्यास कंपनीतील कामगार, विद्यार्थी, मुरबाडला येणारे व्यावसायिक, भाजीपाला विक्रेते तसेच छोट्या-मोठ्या व्यवसायांशी संबंधित नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे परिसरातील वाहतूक सुविधा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. यावेळी ठाणे जिल्हा एकता मंच कल्याण ग्रामीणचे अध्यक्ष भरत दळवी यांनी प्रशासनाकडे बससेवा शक्य तितक्या लवकर सुरू करण्याची विनंती केली. ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन प्रवासासाठी ही सेवा अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

## ४४ गावे व १४५ पाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा

ठाणे : (स. गांवकरी)

उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद ठाणेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत टंचाईग्रस्त भागांमध्ये प्रभावी नियोजन करून टँकरद्वारे नियमित पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दिनांक ०८ जून, २०२६ अखेरच्या अहवालानुसार जिल्ह्यातील ४४ गावे व १४५ पाड्यांमधील ९९ हजार ३९७ नागरिकांना ४५ टँकरच्या माध्यमातून पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पाणीटंचाईचा त्रास होऊ नये यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना हाती घेतल्या आहेत. टंचाईग्रस्त गावांमध्ये नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी परिस्थितीचा सातत्याने आढावा घेतला जात असून आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. जिल्ह्यात सर्वाधिक पाणीटंचाई शहापूर तालुक्यात असून तेथे ३८ गावे व १३५ पाडे टंचाईग्रस्त आहेत. या भागातील ९३ हजार ७३१ नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी ४२ खाजगी टँकर कार्यरत आहेत.

शहापूर तालुक्यातील दुर्गम व आदिवासी भागांमध्येही नियमित पाणीपुरवठा पोहोचविण्यासाठी प्रशासनाकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मुरबाड तालुक्यातील ६ गावे व १० पाड्यांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून तेथील ५ हजार ६६६ नागरिकांसाठी ३ खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे. जिल्हा परिषद ठाणेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागामार्फत टंचाईग्रस्त भागांतील परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून नागरिकांना वेळेत व पुरेशा प्रमाणात पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.

## ग्रामसभेत ग्रामपंचायत वार्ड आरक्षण घोषित



- एकुण वार्ड ४, व सदस्य संख्या ११ जागा पैकी सहा महिला पाच पुरूष साठी आरक्षित

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

नांदेड तालुक्यातील गोपाळचावडी ग्रामपंचायत निवडणूक वार्ड आरक्षण 2011जनगणनेच्या नुसार 4068 एकुण लोकसंख्या असलेल्या ग्रामपंचायत साठी सदस्य संख्या 11असुन वार्ड 4 आहेत,यात महिला 6 व पुरुष 5 साठी आरक्षित झाल्या आहेत आगामी थैट जनतेतून एसटी महिला सरपंच पदासाठी आरक्षित झाली असल्याने ग्रामपंचायत वर सात महिलाचे वर्चस्व राहणार आहे. आगामी होणाऱ्या ग्रामपंचायत गोपाळचावडी येथे वार्ड आरक्षण निवडणूक साठी वार्ड निहाय आरक्षण नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांच्या आदेशानुसार तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी संतोष आकुसकर व तलाठी योगीता अन्नमवार, ग्रामसेवक सौ.वर्षा पाटील यांच्या उपस्थितीत ग्रामसभा घेण्यात आली.यावेळी माजी सरपंच सौ.सुरेखा प्रदीप लाखे ,माजी उप सरपंच साहेबराव सेलुकर, सदस्य प्र पत्रकार अनिल पाटील धमने . माजी स प्रल्हाद काब्दे, माजी पोलीस पाटील संजय शिंदे, सदस्य प्रतिनिधी पाटील, पंडित गजभारे,पोलीस पाटील सौ.छाया विजय खटके यांच्या सह ग्रामपंचायत सदस्य व गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वार्ड क्रं १ ) एससी सर्वसाधारण, सर्वसाधारण महिला ,सर्वसाधारण पुरूष तीन जागा ,वार्ड २ ) एसटी महिला, सर्वसाधारण ,एक जागा वार्ड क्रं ३) एस.सी. महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण एक , आशा तिनं जागा,वार्ड क्रं 4 एससी महिला, ओबीसी महिला सर्वसाधारण एक , आशा तीन जागा असून यामध्ये एकुण अकरा जागेसाठी वार्ड निहाय आरक्षण आरक्षीत झाले आहे. घोषीत झालेल्या या वार्ड आरक्षण संदर्भात दि १७ जुनं रोजी ग्रामपंचायत कार्यालय येथे तलाठी अन्नमवार यांच्या उपस्थितीत हरकती स्विकारण्यात येणार आहेत.यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार मारोती माने, बापुराव जाधव यांनी पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

## छत्रपती शिक्षण व ज्ञानदीप शिक्षण संस्थेची सहविचार सभा उत्साहात संपन्न



श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था, ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्था तसेच श्री तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने सहविचार सभेचे आयोजन इंदिरा गांधी पॉलिटेक्निक, बेलवंडी शुगर येथे करण्यात आले. बुधवारी (दि. १० जून) झालेल्या या सभेला शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, प्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे होते. यावेळी त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करताना शिक्षण क्षेत्रातील बदलत्या गरजा, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संस्थांच्या भावी वाटचालीबाबत विचार मांडले. तसेच संस्थांच्या उभारणीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान लाभल्याचे सांगत त्यांचा गौरव केला. याप्रसंगी संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड तसेच ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड यांनी विद्यार्थ्यांचे भवितव्य, कौशल्याधारित शिक्षण आणि अद्ययावत शिक्षण प्रणाली याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे निरीक्षक एस. पी. गोलांडे, श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी, नागवडे सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान संचालक प्रा. सुरेशराव रसाळ, प्राचार्य अमोल नागवडे, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक आप्पासाहेब जगताप, अहमदनगर शिक्षक सोसायटीचे माजी चेअरमन दिलीपराव काटे तसेच नागवडे सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक प्रा. सुनीलराव माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंदिरा गांधी पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे यांनी केले. सूत्रसंचालन रमजान हवालदार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्रा. नातू यांनी मानले. शैक्षणिक क्षेत्रातील विविध विषयांवर सखोल चर्चा आणि विचारमंथन झाल्याने ही सहविचार सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.

## २८ जून रोजी पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे व्यापक नियोजन

- १,१७,६९४ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस देण्याचे उद्दिष्ट
- १,८७८ लसीकरण बूथ, १,३४७ घरभेट पथके सज्ज

ठाणे : (स. गांवकरी)

देशाला पोलिओमुक्त ठेवण्याच्या राष्ट्रीय उद्दिष्टाला बळकटी देण्यासाठी २८ जून, २०२६ रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेसाठी ठाणे जिल्ह्यात व्यापक सूक्ष्म नियोजन (Micro Plan) पूर्ण करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या समन्वयातून ग्रामीण व शहरी भागातील प्रत्येक पात्र बालकापर्यंत पोलिओ प्रतिबंधक लस पोहोचविण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे. या मोहिमेंतर्गत जिल्ह्यातील सुमारे १ लाख १७ हजार ६९४ बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचा डोस देण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. यासाठी ग्रामीण व शहरी भागात मिळून १ हजार ८७८ लसीकरण बूथ उभारण्यात येणार असून, त्यावर कार्य करण्यासाठी ४ हजार ३४८ कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. बूथच्या कामकाजावर देखरेख ठेवण्यासाठी ३७४ पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. लसीकरणापासून एकही बालक वंचित राहू नये यासाठी विशेष घरभेट मोहिमेचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील अंदाजे ६ लाख ६९ हजार ७७३ घरांना भेटी देण्यासाठी १ हजार ३४७ पथके कार्यरत राहणार असून, या कामासाठी एकूण ५ हजार ३२३ पथक-दिवसांचे नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २६३ पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले असून, त्यांचे एकूण १ हजार ३६ पर्यवेक्षक-दिवस नियोजित करण्यात आले आहेत.

# ठाणे जिल्ह्यात जनजागृती कार्यक्रम उत्साहात संपन्न

## "PMSMA ची १० वर्षे – सुरक्षित गर्भधारणा, निरोगी माता, सक्षम भारत" या संकल्पनेला बळकटी

ठाणे : (स. गांवकरी)

भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान (PMSMA) या महत्त्वपूर्ण उपक्रमाच्या यशस्वी दशकपूर्ती वर्षानिमित्त ठाणे जिल्ह्यात विविध शासकीय आरोग्य संस्थांमध्ये विशेष जनजागृती, मार्गदर्शन व प्रसूतीपूर्व आरोग्य तपासणी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. "PMSMA ची १० वर्षे – सुरक्षित गर्भधारणा, निरोगी माता, सक्षम भारत" या घोषवाक्याखाली आयोजित या कार्यक्रमांमधून सुरक्षित मातृत्वाचा संदेश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील ५ ग्रामीण रुग्णालये, ४ उपजिल्हा रुग्णालये, ३ शासकीय रुग्णालये तसेच १ स्त्री रुग्णालयामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. गर्भवती महिलांना नियमित प्रसूतीपूर्व तपासणीचे महत्त्व, संतुलित आहार, रक्तक्षय प्रतिबंध, आवश्यक लसीकरण, उच्च जोखीम गर्भधारणेची वेळेत ओळख आणि संस्थात्मक प्रसूती याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे येथे आयोजित प्रमुख कार्यक्रमास निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाली राहुड तसेच स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. शोभना चव्हाण प्रमुख उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थित गर्भवती महिला, त्यांच्या कुटुंबीयांसह आरोग्य कर्मचारी आणि नागरिकांना प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची उद्दिष्टे, शासनामार्फत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या सुविधा आणि सुरक्षित मातृत्वासाठी आवश्यक असलेल्या आरोग्यविषयक बाबींची सविस्तर माहिती दिली. डॉ. शोभना चव्हाण यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, गर्भधारणेदरम्यान नियमित वैद्यकीय तपासणी आणि योग्य पोषण हे माता व बाळाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. उच्च जोखीम असलेल्या गर्भधारणेचे वेळेवर निदान झाल्यास संभाव्य गुंतागुंत टाळून माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करता येते. त्यांनी प्रत्येक गर्भवती महिलेने निर्धारित वेळापत्रकानुसार आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन केले.

निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. मृणाली राहुड यांनी प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानामुळे दुर्गम व ग्रामीण भागातील महिलांनाही तज्ज्ञ आरोग्य सेवा उपलब्ध होत असल्याचे सांगितले. सुरक्षित गर्भधारणा आणि निरोगी मातृत्व ही केवळ आरोग्याची बाब नसून देशाच्या सर्वांगीण विकासाशी निगडित असल्याचे त्यांनी नमूद केले. या अभियानांतर्गत दर महिन्याच्या ९, १८ आणि २७ तारखेला जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये गर्भवती महिलांसाठी विशेष प्रसूतीपूर्व तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या दिवशी तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत सखोल आरोग्य तपासणी, आवश्यक प्रयोगशाळा चाचण्या, उच्च जोखीम गर्भधारणेची ओळख, वैद्यकीय समुपदेशन, औषधोपचार आणि आवश्यक त्या संदर्भ सेवा पूर्णपणे मोफत उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे गर्भधारणेदरम्यान उद्भवणाऱ्या गुंतागुंतींचे वेळेवर निदान होऊन माता आणि बालकांच्या आरोग्याचे प्रभावी संरक्षण करण्यात मदत होत आहे. या कार्यक्रमात १ हजार १७३ गरोदर मातांची तपासणी करण्यात आली तसेच कार्यक्रम 33 प्राथमिक आरोग्य केंद्र 180 उपकेंद्रांमध्ये देखील राबविण्यात आले. गेल्या दहा वर्षांत प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाने देशभरातील लाखो गर्भवती महिलांना गुणवत्तापूर्ण प्रसूतीपूर्व आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

या माध्यमातून सुरक्षित मातृत्वाचा संदेश सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासह माता व बालमृत्यू दर कमी करण्यासाठी मोठे कार्य झाले आहे, अशी माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती पाटील यांनी दिली.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



## थोडक्यात पण महत्वाचे



### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, निवड झालेल्या रोहणे यांचा सत्कार!

मुरबाड (स. गांवकरी) : सामाजिक बांधिलकी जपत भरत दळवी युवा विकास मंच मुरबाड विधानसभा आणि ठाणे जिल्हा एकता मंच कल्याण ग्रामीण यांच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. नवगाव येथील गरजू व गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले, तर मुंबई पोलीस दलात निवड झालेल्या उज्ज्वल राजेंद्र रोहणे यांचा सन्मान करण्यात आला. कल्याण ग्रामीण भागातील नवगाव येथे आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी गावच्या सरपंच सुरेखा टेंभे आणि पोलीस पाटील सुरेश टेंभे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्य देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. दरम्यान, पिंपळोली गावातील उज्ज्वल राजेंद्र रोहणे यांची मुंबई पोलीस दलात निवड झाल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करत भविष्यातील कारकिर्दीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी भरत दळवी यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधावी तसेच युवकांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवून समाजाचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन केले. मुरबाड विधानसभा मतदारसंघात सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या उपक्रमांना अधिक गती देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### दोन आठवड्यांच्या आत मुरबाड तालुक्याची आमसभा घ्यावी

मुरबाड (स. गांवकरी) : मुरबाड तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्नांवर चर्चा होऊन त्यातून मार्ग निघावा, तसेच सर्वसामान्य नागरिकांना आपले प्रश्न थेट प्रशासनासमोर मांडता यावेत यासाठी पुढील दोन आठवड्यांच्या आत मुरबाड तालुक्याची आमसभा आयोजित करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी यांनी केली आहे. भरत दळवी युवा विकास मंच, मुरबाड विधानसभा यांच्या वतीने पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात तालुक्यातील रस्ते, राष्ट्रीय महामार्ग, जोडरस्ते, ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावरील विकासकामे, मुरबाड एमआयडीसी, बेरोजगारी, कुचकामी अधिकारी, प्रशासनातील मनमानी कारभार, वाढता भ्रष्टाचार, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील दुर्लक्ष, कामगारांचे प्रश्न आदी विषयांवर सविस्तर चर्चा होण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली आहे. आमसभेमुळे सर्व प्रशासकीय अधिकारी आणि नागरिक समोरासमोर येतील व प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून अनेक प्रलंबित प्रश्नांना दिशा मिळेल, असा विश्वास भरत दळवी यांनी व्यक्त केला. तसेच मुरबाडमध्ये अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांची गरज, ग्रामीण रुग्णालयात अस्थिरोगतज्ज्ञांची नियुक्ती, पाणीटंचाईचा प्रश्न, गैरधंद्यांवर नियंत्रण आणि सामाजिक संस्थांचा सहभाग यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरही आमसभेत चर्चा व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. गेल्या अनेक वर्षांपासून तालुक्याची आमसभा झालेली नसल्याने गटविकास अधिकारी यांनी लवकरात लवकर आमसभा आयोजित करून नागरिकांना न्याय मिळवून द्यावा, अशी विनंती भरत दळवी यांनी केली आहे.

### फांगूळगव्हाण ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकाविरोधात मनसे आक्रमक

मुरबाड (स. गांवकरी) : फांगूळगव्हाण ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक बाळू उंद्रू कोकणे यांच्यावर घरकुल योजनेचा लाभ देण्यासाठी ग्रामस्थांकडून पैशांची मागणी केल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुरबाड तालुकाध्यक्ष अरुण वारघडे यांनी त्यांची खातेनिहाय चौकशी करून तात्काळ निलंबन करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात काही ग्रामस्थांचे व्हिडिओ समोर आल्याचा दावा करण्यात आला असून, एवढे असूनही प्रशासनाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचा आरोप मनसेने केला आहे. यापूर्वीही १० फेब्रुवारी २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती. तसेच ५ मे २०२६ रोजी मुरबाड पंचायत समिती प्रशासनालाही याबाबत प्रत देण्यात आली होती. दरम्यान, संबंधित प्रकरणात प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास १२ जून रोजी मुरबाड पंचायत समिती कार्यालयासमोर मनसेच्या वतीने "शिट्टी वाजवा" निषेध आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा अरुण वारघडे यांनी दिला आहे. या आंदोलनात तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. वरील आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या निवेदनावर आधारित असून, संबंधित आरोपांबाबत प्रशासन किंवा संबंधित ग्रामसेवक यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.



### मराठा साम्राज्याचा नकाशा वगळल्याच्या निषेधार्थ आंदोलन

मुंबई /नाशिक (स. गांवकरी) : राष्ट्रीय शैक्षिक अनुसंधान प्रशिक्षण परिषद (NCERT)ने आठवीच्या पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळल्याच्या निषेधार्थ काल मंगळवारी (दि९) मुंबई येथील आझाद मैदाना येथे नागपूरचे मुधोजीराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली एक दिवस धरणे आंदोलन करण्यात आले. इतिहासाच्या पुनर्स्थापनेसाठी समस्त शिवप्रेमी, इतिहासप्रेमी आणि जागरूक नागरिक, आठरा पगड जाती धर्मांचा इतिहास हा केवळ पुस्तकांतील मजकूर नसून तो राष्ट्राचा स्वाभिमान आणि अस्मिता आहे. दुर्दैवाने, NCERT च्या पाठ्यपुस्तकांतून मराठा साम्राज्याचा नकाशा वगळण्याचा निर्णय हा केवळ एक तांत्रिक बदल नसून तो आपल्या गौरवशाली इतिहासाला पुसून टाकण्याचा प्रयत्न आहे. हा प्रकार आम्हा शिवप्रेमींसाठी कदापी स्वीकारार्ह नाही. या संदर्भात आझाद मैदान येथे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी माता जिजाऊंचे माहेरकडील वंशज शिवाजीराजे जाधव, छावा भारत क्रांती मिशन राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विलासभाऊ पांगारकर, छावा भारत क्रांती मिशनचे राष्ट्रीय संघटक परमेश्वर नलावडे पाटील ,पुणे येथील योगेश देशमुख निवृत्ती मुरडणार आदी सह शेकडो शिवप्रेमी उपस्थित होते. एनसीईआरटी (NCERT) विरोधात मुंबईतील आझाद मैदानावर झालेल्या आंदोलनाची अखेर शासनाने दखल घेत. माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांना आझाद मैदानावर पाठवले होते. त्यानंतर आंदोलकांच्या शिष्टमंडळाला मंत्रालयात पाचारण करून त्यांचे निवेदन मुख्यमंत्री यांनी स्वीकारून सविस्तर चर्चा केली."यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मी स्वतः या विषयात पुढाकार घेतो आणि योग्य तो मार्ग काढतो," असा सकारात्मक शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला आहे.

## आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलच्या
# किडनी व युरोलॉजी स्क्रीनिंग कॅम्पला उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे : (स. गांवकरी)



चिंचवड येथील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल येथे आयोजित करण्यात आलेला किडनी, युरिनरी आणि प्रोस्टेट स्क्रीनिंग कॅम्प नुकताच यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमाला नागरिकांकडून मोठा आणि उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून कॅम्पदरम्यान १००० हून अधिक रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.किडनी व युरोलॉजी संबंधित आजारांचे लवकर निदान, प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि जनजागृती या उद्देशाने हा विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला होता. बदलत्या जीवनशैलीमुळे वाढत असलेल्या किडनी व मूत्रविकारांच्या समस्यांबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता.कॅम्पदरम्यान रुग्णांची तपासणी तज्ज्ञ युरोलॉजिस्ट, नेफ्रोलॉजिस्ट आणि अनुभवी वैद्यकीय पथकाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अत्याधुनिक निदान सुविधा, त्वरित तपासणी प्रक्रिया आणि तज्ज्ञांचे सल्लामसलत यामुळे रुग्णांना योग्य मार्गदर्शन मिळाले.

या उपक्रमाबाबत बोलताना आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पामेश गुप्ता म्हणाले,"हा उपक्रम आमच्या प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आणि लवकर निदान या संकल्पनेशी जोडलेला आहे. किडनी व युरोलॉजी आजारांमध्ये वेळेवर निदान केल्यास गंभीर गुंतागुंत टाळता येते. नागरिकांनी दिलेला प्रचंड प्रतिसाद हे आरोग्य जनजागृती वाढत असल्याचे सकारात्मक चिन्ह आहे."

या कॅम्पमध्ये रुग्णांमध्ये आढळणाऱ्या विविध लक्षणांवर विशेष लक्ष देण्यात आले. यामध्ये मूत्रत्याग करताना वेदना किंवा अडचण, फेसाळ किंवा रक्तमिश्रित लघवी, पाठ किंवा कंबरेतील सतत वेदना, शरीरात सूज येणे, भूक कमी होणे, सतत थकवा जाणवणे आणि श्वास घेण्यास त्रास होणे अशा लक्षणांचा समावेश होता. ही लक्षणे अनेकदा दुर्लक्षित केली जातात, मात्र ती किडनी किंवा युरोलॉजिकल आजारांची सुरुवातीची चिन्हे असू शकतात, असे तज्ज्ञांनी सांगितले.

आदित्य बिर्ला हॉस्पिटल कडून या कॅम्पअंतर्गत रुग्णांना ९९ रु. मध्ये किडनी व युरोलॉजी स्क्रीनिंग पॅकेज उपलब्ध करून देण्यात आले होते. यामध्ये आरबीएस बीएमआय , बीपी मॉनिटरिंग, पीएसए (५०+), सिरम क्रिएटिन , युरीन रुटीन मायक्रोस्कोपी आणि तज्ज्ञ सल्ला यांचा समावेश होता. तसेच पुढील उपचारांसाठी आवश्यक असल्यास डायग्नोस्टिक तपासण्या, रेडिओलॉजी आणि शस्त्रक्रिया सेवांवर सवलत देखील देण्यात आली.

याशिवाय ₹999 मध्ये संपूर्ण आरोग्य तपासणी पॅकेज (मूळ किंमत ₹10,000) उपलब्ध करून देण्यात आले, ज्यामध्ये ईजीएफआर , सिरम इलेक्ट्रोलाईट्स , सीबीसी , युरीन कल्चर आणि रुटीन, युएसजी केयूबी + पीव्हीआर, पीएसए , सिरम क्रिएटिन आणि विशेषज्ञ सल्ला यांचा समावेश होता. काही विशेष चाचण्या जसे की युरोडायनॅमिक स्टडी आणि युरोफ्लोमेट्री देखील सवलतीच्या दरात उपलब्ध होत्या. या कॅम्पमधील महत्त्वाचे निदान घटक म्हणून ईजीएफआर द्वारे किडनी फिल्ट्रेशन क्षमता, युएसजी केयूबी द्वारे किडनी-युरेटर-ब्लॅडरची स्थिती आणि पीव्हीआर द्वारे ब्लॅडर रिकामी होण्याची क्षमता यांचे मूल्यमापन करण्यात आले. या यशस्वी उपक्रमातून आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलने पुन्हा एकदा प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, जनजागृती आणि लवकर निदानाचे महत्त्व अधोरेखित केले असून भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे नागरिकांचे आरोग्य सुदृढ करण्यावर भर दिला जाणार आहे.

## ब्लू रिबँड जिन नव्या आधुनिक अवतारात

पुणे : (स. गांवकरी)

ब्लू रिबँड जिनने आपल्या नव्या आकर्षक रूपाचे अनावरण केले असून, भारतातील सर्वाधिक प्रतिष्ठित जिन ब्रँडपैकी एकाला नव्या पिढीच्या ग्राहकांसाठी नव्याने सादर केले आहे. नव्या पॅकेजिंगमुळे ब्रँडला आधुनिक आणि प्रीमियम ओळख मिळाली आहे, तर त्याचा विश्वासार्ह स्वाद आणि समृद्ध वारसा कायम ठेवण्यात आला आहे, ज्यामुळे ब्लू रिबँड जिन अनेक दशकांपासून ग्राहकांची पसंती ठरली आहे. हा बदल विकसित होत असलेल्या बाजारपेठेत सुसंगत राहण्याची, शेल्फवरील आकर्षकता वाढवण्याची आणि दीर्घकाळापासून ब्रँडशी जोडलेल्या ग्राहकांसोबत तसेच आधुनिक जिन पसंत करणाऱ्या नव्या ग्राहकांसोबत अधिक मजबूत नाते निर्माण करण्याची ब्लू रिबँड जिनची वचनबद्धता दर्शवतो. या लॉन्चबाबत बोलताना इनब्रू बेव्हरेजेसचे जनरल मॅनेजर - मार्केटिंग, श्री. सुमित तिवारी म्हणाले, "या नव्या ओळखीमुळे ब्लू रिबँड एका नव्या पर्वात प्रवेश करत आहे, जे परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर समतोल साधते. नव्या पॅकेजिंगची रचना ब्रँडची आधुनिक आकर्षकता वाढवण्यासाठी करण्यात आली आहे, तसेच ग्राहकांना आवडणारा विश्वास, परिचित अनुभव आणि चवीचा दर्जा कायम ठेवण्यात आला आहे. हा बदल इनब्रू बेव्हरेजेसच्या पोर्टफोलिओला अधिक प्रीमियम आणि मजबूत बनवण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. आधुनिकता आणि ग्राहक-केंद्रित नवकल्पनांच्या माध्यमातून हा ब्रँड आपल्या निष्ठावान ग्राहकांबरोबरच प्रीमियम जिन अनुभव शोधणाऱ्या नव्या पिढीलाही आकर्षित करेल."

## चंद्रकांतदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त १०० वृक्षांचे रोपण

नांदड जिल्हा : (स. गांवकरी)



महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ परिसरात १०० वृक्षरोपांची लागवड करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि उच्च शिक्षण विभाग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला हा हरित उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या विशेष उपक्रमांतर्गत विद्यापीठ परिसरात विविध प्रकारच्या फळझाडांसह पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करण्यात आली. वृक्षलागवडीच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. मनोहर चासकर यांनी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, "वृक्षलागवड ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून पर्यावरण रक्षणाची दीर्घकालीन जबाबदारी आहे. विद्यार्थी, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी वृक्षारोपणासोबतच त्यांचे संगोपन करण्यालाही प्राधान्य द्यावे. वाढदिवस आणि इतर महत्त्वाचे समारंभ पर्यावरणपूरक उपक्रमांनी साजरे करण्याची संस्कृती समाजात रुजविणे ही काळाची गरज आहे."

विद्यापीठात सामाजिक बांधिलकी जपत विविध पर्यावरणपूरक आणि जनहिताचे उपक्रम सातत्याने राबविले जात असून, अशा उपक्रमांमधून समाजासमोर आदर्श निर्माण करण्याची परंपरा जोपासली जात असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमास कुलगुरु डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, उच्च शिक्षण विभाग नांदेडचे सह-संचालक डॉ. बाबासाहेब भोसले, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजाराम माने, वित्त व लेखा अधिकारी डॉ. राजेश शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. एम. जी. गायकवाड, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजपालसिंह चिखलीकर, अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे, उद्यान विभागाचे सहाय्यक कुलसचिव रामदास पेद्देवाड यांच्यासह उद्यान विभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वृक्षलागवडीच्या या उपक्रमामुळे विद्यापीठ परिसर अधिक हिरवागार होण्यास हातभार लागणार असून, पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करण्याचा महत्त्वपूर्ण संदेशही समाजापर्यंत पोहोचला. संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात

## राज्याचे कृषी विस्तार सहसंचालक यांचेकडून शेतीचे कौतुक





अकोले - संजय फुलसुंदर (स. गांवकरी)

पुणे येथील राज्याचे कृषी विस्तार सहसंचालक मा.बाबासाहेब जेजुरकर यांनी काल कोतुळ येथील प्रयोगशील, आणि वो महाराष्ट्र शासनाच्या कृषिभूषण पुरस्काराने सन्मानित शेतकरी सयाजीराव पोखरकर यांच्या कोतुळ येथील शेतीला भेट देऊन विविध प्रयोगांची पाहणी केली. त्यावेळी प्रतिकूल परिस्थितीमध्ये पोखरकर बंधूंनी शेतीविषयक केलेल्या पीक प्रयोगांचे कौतुक केले.

कोतुळ आणि कोतुळ पंचक्रोशी मध्ये सुरुवातीपासून शेतीविषयक नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रतिकूल परिस्थितीमध्ये कारली, कोबी, वालवड ,टोमॅटो, झेंडू ,आद्रक/ आले तसेच ऊस या पिकांच्या लागवडी ची पद्धती नेहमीच या परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरलेली आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करून ठिबक व तुषार सिंचनाचा प्रयोग,मल्चिंग प्लास्टिक ऐवजी पिकांच्या अवशेषांचा वापर, रुंद सरी पद्धत, कंपोस्ट खत निर्मिती, गांडूळ खत प्रकल्प, दशपर्णी अर्काचा वापर, बांधावरील सघन आंबा लागवड, इत्यादी प्रयोगांची कृषी संचालक श्री.बाबासाहेब जेजुरकर यांनी पाहणी केली. आणि समाधान व्यक्त केले. पावसाळी हंगामाच्या पार्श्वभूमीवर हुमणी किडीचा विविध पिकांवर होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोतुळ परिसरात काळे फार्मवर आयोजित केलेल्या हुमणी नियंत्रणासाठीच्या भुंगेरे गोळा करण्याच्या प्रकाश सापळ्यांच्या पथदर्शक प्रकल्पालाही श्री.जेजुरकर यांनी भेट दिली.

यावेळी कृषी विस्तार सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांचे समवेत संगमनेर येथील उपविभागीय कृषी कार्यालयातील तंत्र अधिकारी किरण विरकर,अकोले तालुका कृषी अधिकारी अतुल पवार, कोतुळ मंडळाचे कृषी अधिकारी नारायण घुले, उप कृषी अधिकारी राजाराम साबळे,श्री.लक्ष्मण पवार, अनिल फापाळे, सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती सुनिता फटांगरे, सहाय्यक कृषी अधिकारी दातीर मॅडम, कृषिभूषण किसनराव पोखरकर, संजयजी पोखरकर, भाऊसाहेब पोखरकर,आदित्य पोखरकर, मोहन साबळे पत्रकार संजयजी फुलसुंदर यांचे सह परिसरातील अनेक शेतकरी, ग्रामस्थ उपस्थित होते.

## २३१ फूट उंच भव्य मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात

आळंदी : (स. गांवकरी)

ता. खेड, जि. पुणे येथील २३१ फूट उंच मंदिर संकुलात अखंड हरिनाम सप्ताह आणि विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात भाविकांना पूज्य भास्कर महाराज, नामदेव महाराज पाटील आणि इतर संत-महात्म्यांच्या प्रेरणादायी प्रवचनांतून आध्यात्मिक मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थी आणि मुलांसाठीच्या संस्कार कार्यक्रमाचे उद्घाटन समाजसेवक श्री. नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला आणि इतर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पूज्य भास्कर महाराज म्हणाले की, महाराष्ट्रातील आळंदी येथील या भव्य मंदिराचे स्वप्न साकार होणे हे ईश्वराची कृपा आणि ज्येष्ठांच्या आशीर्वादाचे फळ आहे. कार्यक्रमादरम्यान श्री. नानजीभाई थानावाला यांनी सांगितले की, ही संस्था हजारो विद्यार्थ्यांना सांस्कृतिक आणि आध्यात्मिक शिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. या संस्थेचे विद्यार्थी गावोगावी जाऊन कीर्तन व धार्मिक जनजागृतीचे कार्यक्रम सादर करतात आणि कोणत्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता समाजसेवेत सहभागी होतात. आतापर्यंत सुमारे ५०० ते ६०० वारकऱ्यांनी येथून शिक्षण आणि संस्कार आत्मसात केले आहेत.

अलीकडेच, भाविकांच्या भोजनासाठी एक मोठी जागा विकसित करण्यात आली आहे. सभागृहाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर, प्रत्येक भाविकाला मोफत भोजन देण्याची योजना अंमलात आणली जाईल. तसेच, मंदिराचे तांत्रिक काम आणि कळसाचे बांधकामही लवकरच पूर्ण केले जाईल, असे सांगण्यात आले.

# माणूस संधीसाधू बनला : नंदकुमार पोवार

संगमनेर : (स. गांवकरी)



- महंत गगनगिरींचा महिमा अजरामर राहील
- माणसाच्या गरजा माणसाच्या हातात पाहिजे
- विचार ऐकायला आम्ही तयार नाही
- अध्यात्म सांगणे सोपे, जगणे कठीण; गगनगिरी महाराजांचे अखंड नामस्मरण

अध्यात्म सांगणे सोपे असते, परंतु ते आचरणात आणून जगणे अत्यंत कठीण असते. अध्यात्माला बदनाम करू नका. जसा मासा पाण्याशिवाय राहू शकत नाही, तसेच मानवाचे जीवन अध्यात्माशिवाय परिपूर्ण होऊ शकत नाही असे प्रतिपादन ज्येष्ठ व्याख्याते माजी सरपंच नंदकुमार पोवार ( गगनबावडा ) यांनी केले.

स्वामी परमपूज्य गगनगिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी गगनगिरी महाराजांच्या तपश्चर्येचा, त्यागाचा आणि लोककल्याणकारी कार्याचा भावपूर्ण वेध घेत उपस्थित भाविकांना प्रबोधन केले. पोवार म्हणाले की, गगनगिरी महाराजांच्या सान्निध्यात येताच प्रत्येक आत्मा पावन होतो. कृतज्ञता व्यक्त करताना कधीही कमीपणा वाटून घेऊ नका. महाराजांनी आयुष्यभर ऊन, वारा, पाऊस झेलत कठोर साधना केली. अन्न पाण्याची पर्वा न करता त्यांनी आत्मोन्नतीचा मार्ग स्वीकारला. वन्य प्राणी आणि श्वापदांनाही त्यांनी आपुलकीने सांभाळले.

गगनगिरी महाराज हे जन्मजात ईश्वरी अवतारातील योगी होते. त्यांनी विविध ठिकाणी कठोर तपश्चर्या करत अध्यात्माचे सामर्थ्य जगासमोर ठेवले. दक्षिण भारतातील साधना, महालक्ष्मीचे आशीर्वाद आणि ईश्वरप्राप्तीसाठी केलेली अष्टांग योगसाधना यांचा उल्लेख करत पोवार यांनी महाराजांच्या अलौकिक जीवनकार्याचा उहापोह केला.

आजच्या काळात बुवा बाबांचे पेव फुटले असले तरी खरे संत समाजाला दिशा देणारे असतात. गगनगिरी महाराजांनी लोकांतातून एकांताचा मार्ग स्वीकारून आत्मसाधना केल्याचे त्यांनी नमूद केले. नगर जिल्ह्यात भक्तीचे बीज रोवून हरिनामाचा जागर घडविण्याचे कार्य गगनगिरी महाराजांच्या कृपेने घडत आहे. हा सप्ताह सोहळा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजप्रबोधनाचा आणि अध्यात्मिक उन्नतीचा एक ईश्वरी मेळावा असल्याचे पोवार यांनी सांगितले.

व्याख्याना नंतर जयवंत महाराज पाटील ( राधानगरी ) यांचे कीर्तन झाले. सकाळी आठ ते अकरा ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी पाच ते सहा हरिपाठ घेण्यात आला.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या महाप्रसादासाठी ओझर खुर्द ग्रामस्थांनी १०१ क्विंटल साखर, ५१ क्विंटल तांदूळ तसेच भाकरी-आमटी प्रसादाचे उदार योगदान देत आपल्या श्रद्धा व भक्तीचा अनोखा परिचय दिला. ग्रामस्थांच्या या सेवाभावी दानामुळे भाविकांचे मन भावविभोर झाले.

या दानाची घोषणा होताच संपूर्ण परिसर "जय श्रीराम" आणि "रामचंद्र की जय"च्या जयघोषांनी दुमदुमून गेला. टाळ्यांच्या कडकडाटात भाविकांनी या सेवाभावाचे स्वागत केले. भक्ती आणि आनंदाच्या वातावरणात अनेक भक्त रामनामाच्या गजरात नृत्य करत उत्स्फूर्त आनंदोत्सव साजरा करताना दिसून आले.

# थोडक्यात पण महत्वाचे



## इलेक्ट्रिक वाहन वापराचे बारामती हे उदयोन्मुख केंद्र

बारामती (स. गांवकरी) : ऑयलर मोटर्सने नुकताच बारामतीमध्ये ग्राहक मेळावा आयोजित केला होता.ग्राहक मेळाव्यात, ऑयलर मोटर्सचे संस्थापक आणि सीईओ सौरभ कुमार यांच्यासह स्थानिक नेते व मान्यवर उपस्थित होते. त्यांनी शहरातील ईव्ही वाहनधारकांचा सत्कार केला आणि बारामतीने उदयोन्मुख ईव्ही शहर म्हणून मिळवलेल्या नावलौकिकाबद्दल अभिनंदन केले. अनेक ग्राहक आणि मान्यवरांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला आणखी चालना देण्याचा संकल्प केला. जागतिक पर्यावरण दिनी, गेल्या आठवड्यात, महाराष्ट्रात नावाजलेले दूध शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बारामतीने इलेक्ट्रिक वाहन वापराचे उदयोन्मुख केंद्र म्हणून आपली वाटचाल अधोरेखित केली. स्थानिक व्यावसायिक वाहनधारक डिझेल, पेट्रोल आणि सीएनजीकडून इलेक्ट्रिक वाहनांकडे टप्प्याटप्प्याने वळत असून वापर झपाट्याने वाढला आहे. सध्या बारामतीच्या रस्त्यांवर १२५ हून अधिक ऑयलर इलेक्ट्रिक वाहने धावत आहेत. सर्वांत मोठे आकर्षण ठरले आहे ते म्हणजे कमी वाहतूक खर्च. पूर्वी डिझेल आणि सीएनजीवर महिन्याला ₹४०,०००–५०,००० खर्च करणाऱ्या वाहनधारकांच्या मते इलेक्ट्रिक वाहनांमुळे हा खर्च ₹३,०००–५,००० पर्यंत खाली आला आहे. इंधनावर चालणाऱ्या वाहनांच्या तुलनेत असलेली समान खरेदी किंमत आणि विश्वासार्ह सेवा यांच्या जोडीने या बचतीमुळे वापरात लक्षणीय वाढ झाली आहे.

## नेटफ्लिक्स तर्फे लॉक अप च्या सुरुवातीची घोषणा




पुणे (स. गांवकरी) : काही दिवसांच्या अनेक तर्कवितर्कांनंतर तसेच वेगवेगळ्या शहरांतील मुखवटा घातलेल्या "कैद्यांच्या" गूढ दर्शनांनंतर आणि सोशल मीडियावर विविध गोष्टींची रंगतदार चर्चा होत असतांना, नेटफ्लिक्स चर्चा रंगत असताना, नेटफ्लिक्स तर्फे आज अधिकृतपणे एकता कपूर यांच्यसा बालाजी टेलिफिल्म्सच्या सहकार्याने लॉक अप चा प्रीमियर २७ जून रोजी होणार असल्याची घोषणा करण्यात आली. ही घोषणा लॉक अप साठी अगदी योग्य वातावरण तयार करत असून यामध्ये भारतातील सर्वाधिक चर्चेत असलेल्या काही व्यक्तींना एका छताखाली बंदिस्त केले जाईल. पण मोठा खुलासा होण्यापूर्वी एक असा तमाशा घडेल,याची कुणालाही अपेक्षा नव्हती. शहरांतील लोकांनी अक्षरशः दोनदोनदा वळून पाहावं लागलं. कारण एका प्रचंड होर्डिंगमध्ये तुरुंगाच्या गजांआड बंदिस्त कैदी असल्याचं दिसून आलं. या थक्क करणाऱ्या या चित्रांची क्षणार्धात संपूर्ण शहरात चर्चा सुरू झाली; लोकांची गर्दी, कॅमेरे आणि असंख्य प्रश्न यांना त्या चित्रांनी आकर्षित केलं. हे गूढ कैदी नेमके कोण होते? आणि त्यांना नक्की कोणत्या कारणासाठी कैद करण्यात आलं होतं? आता शेवटी हे रहस्य उलगडले आणि नवीन काऊंटडाऊन सुरु झाले आहे. लॉक अप आता २७ जून पासून नेटफ्लिक्स वर प्रसारित करण्यात येणार आहे. तर मग ही जागा पाहण्यास तयार रहा, कारण खरे नाट्य आता सुरु होणार आहे.

## हेलिऑनने पहिले उत्पादन केंद्र उभारण्यासाठी गुंतवणूक केली जाहीर




पुणे (स. गांवकरी) : बेहतर एव्हरीडे हेल्थवर लक्ष केंद्रित करणाऱ्या हेलिऑन या ग्राहक कंपनीने आज भारतात पहिले उत्पादन केंद्र उभारण्याची योजना जाहीर केली. मध्य प्रदेशातील पिथमपूर येथे अत्याधुनिक ग्रीनफिल्ड साइट उभारली जाणार असून ती स्मार्ट इंडस्ट्रियल पार्कमधील 40 एकरांहून अधिक क्षेत्रावर पसरलेली असेल. ही सुविधा भारताच्या ग्राहक आरोग्य क्षेत्रातील महत्त्वपूर्ण गुंतवणूक ठरणार आहे आणि देशाला धोरणात्मक वाढीच्या बाजारपेठेच्या रूपात बळकट करण्यासाठी हेलिऑनची दीर्घकालीन बांधिलकी अधोरेखित करणार आहे. ही घोषणा खालील मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली डॉ. मोहन यादव, मुख्यमंत्री, मध्य प्रदेश; ब्रायन मॅकनॅमारा, मुख्य कार्यकारी अधिकारी, हेलिऑन; केदार लेले, सीईओ इंडिया आणि अध्यक्ष, हेलिऑन आयएससी; आणि नम्रता पटेल, मुख्य पुरवठा साखळी अधिकारी, हेलिऑन. नवीन उत्पादन केंद्र भारतातील हेलिऑनच्या वाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. हे केंद्र पुरवठा साखळीची स्थिरता मजबूत करेल, स्थानिक मूल्यवर्धनाला चालना देईल आणि आशियातील विस्तृत बाजारपेठांसाठी निर्यात सक्षम करेल.




## मॅरिएट इंटरनॅशनलचा एमएस ग्रुप बरोबर करार

पुणे (स. गांवकरी) : मॅरिएट इंटरनॅशनल ने एमएस ग्रुप बरोबर करार केला असून याअंतर्गत नेपाळमधील काठमांडू येथे पहिला जेडब्ल्यू मॅरिएट ब्रँड सादर करण्यात येणार आहे.2031 पर्यंत हे हॉटेल सुरू होण्याची अपेक्षा आहे.

## गल्फ कॅपिटल कडून मॅनेजमेंट बायआऊटची प्रक्रिया पूर्ण

चेन्नई (स. गांवकरी) : आघाडीच्या रेव्हेन्यू सायकल मॅनेजमेंट, रिस्क ॲडजस्टमेंट आरि हेल्थकेअर टेक्नोलॉजी कंपनी असलेल्या ईसीएलएटी हेल्थ सोल्युशन्स ने गल्फ कॅपिटल कडून मॅनेजमेंट बायआऊट (एमबीओ) ची प्रक्रिया पूर्ण केली.गल्फ कॅपिटल ही जीसीसी ते आशिया पर्यंत गुतंवणूक करणाऱ्या सर्वांत मोठ्या व सक्रीय प्रा.इक्विटी कंपन्यांपैकी एक आहे.या व्यवहारामुळे एका अत्यंत यशस्वी भागीदारीची सांगता होत असून ईसीएलएटीची पूर्ण मालकी पुन्हा तिच्या संस्थापक व व्यवस्थापन टीमकडे सोपवली जात आहे.

# जळालेल्या ट्रान्सफॉर्मर ठिकाणी नवीन ३०० ट्रांसफार्मर



## शेतकरी व सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी यशोधन कटिबद्ध

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांसाठी यशोधन कार्यालयाच्या माध्यमातून शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा करून त्यांचे प्रश्न तात्काळ सोडवले जातात. विविध गावांमधील शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीवरून त्यांचे जळालेले ट्रान्सफॉर्मर वीज वितरण विभागाच्या सहकार्याने नव्याने बसवण्यात आल्याने शेतकऱ्यांना नक्की दिलासा मिळणार आहे

संगमनेर : (स. गांवकरी)

महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते राज्याचे माजी महसूल मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधन जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून तालुक्यातील जळालेल्या 300 ट्रांसफार्मरच्या ठिकाणी नव्याने 300 ट्रांसफार्मर विविध गावांमध्ये बसवण्यात आले आहे.

संगमनेर तालुका हा विस्ताराने मोठा असून 171 गावे व 258 वाड्या वाचल्या आहेत. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यात विद्युतीकरणाचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. मागील काही महिन्यातील वाढलेली उष्णता यामुळे शेती व घरगुती वापरासाठी विजेचा जास्त प्रमाणात वापर झाला. अनेक ठिकाणी ट्रांसफार्मर जळाल्याने शेतकऱ्यांनी यशोधन कार्यालयाकडे नवीन ट्रान्सफॉर्मर बसवण्याकरता सातत्याने पाठपुरावा केला. त्यातून शेतकऱ्यांना हा दिलासा मिळाला आहे

कॅन्सरतज्ञ डॉ. जयश्रीताई थोरात व इंद्रजीत भाऊ थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यशोधन कार्यालयात तालुक्यातील नागरिकांच्या विजेच्या समस्या सोडवण्यासाठी मागील दहा वर्षापासून स्वतंत्र कक्ष कार्यरत आहे. त्या माध्यमातून तालुक्यातील नागरिकांच्या विजेबाबतच्या अडचणी सातत्याने सोडवल्या जातात. यशोधन कार्यालयाच्या वतीने आलेल्या शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेत त्यांच्या जळालेल्या ट्रान्सफॉर्मरच्या ठिकाणी नव्याने ट्रान्सफॉर्मर मिळावा याकरता शासनाच्या वीज वितरण विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला. या माध्यमातून तालुक्यात 300 नवीन 63 केव्ही व 100 के व्ही चे ट्रांसफार्मर बसवण्यात आले. यामध्ये तळेगाव, साकुर, वडगाव पान, जोर्वे धांदरफळ, आश्वी, घुलेवाडी, समनापुर गटामधील विविध गावांमध्ये बसवण्यात आले आहे. वीज पुरवठा नियमित व सुरळीत व्हावा याकरता या ट्रांसफार्मरच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठी मदत होत असल्याने अनेक शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. लोहारे येथील कदम , अभंग व पवार वस्ती येथे या योजनेअंतर्गत 100 केव्ही ट्रांसफार्मर उपलब्ध करून देण्यात आला. हा ट्रांसफार्मर दिल्याबद्दल गावकऱ्यांनी लोकनेते बाळासाहेब थोरात यांचे आभार व्यक्त केले याप्रसंगी हौशीराम सोनवणे,संजय साहेबराव पोकळे,संचालक राजहंस बाळासाहेब कारभारी पोकळे संचालक,राजहंस ट्रान्सपोर्ट, रेवणनाथ कदम, अरुण पोकळे, डॉ संदीप पोकळे, बापू पवार, नवनाथ कदम, दिनकर पोकळे, शांताराम कदम, विजय रणमळे, किसन रणमळे,अगस्ती साळवे, योगेश पोकळे यांच्यासह विविध नागरिक उपस्थित होते.

## पर्यावरण रक्षणासाठी पद्मा फाउंडेशनचे कार्य कौतुकास्पद

पुणे : (स. गांवकरी)

पर्यावरणाचा समतोल राखून भावी पिढीला सुरक्षित व आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून द्यायचे असेल, तर मोठ्या प्रमाणात झाडे लावून ती जागवायला हवीत. प्रत्येकाने एक झाड लावून या उपक्रमात सहभागी व्हायला हवे, असे प्रतिपादन पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान विषयक संसदीय स्थायी समितीच्या अध्यक्षा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले. आईप्रमाणेच माणसाच्या जगण्याला निःस्वार्थपणे श्वास व मायेची सावली देणाऱ्या वृक्षांप्रती आपण कायम कृतज्ञ राहायला हवे, तसेच पद्मा फाउंडेशनचे संस्थापक शशिकांत कांबळे यांचे पर्यावरण क्षेत्रातील कार्याचे तरुणांनी अनुकरण करावे, असे आवाहन पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पद्मा फाउंडेशनच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित 'एक



पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत ५,००० झाडे लावण्याच्या अभियानाचा शुभारंभ प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. सिंहगड रस्त्यावरील मॉटेरोसा सोसायटीच्या आवारात आयोजित कार्यक्रमात उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे महानगरपालिकेच्या नगरसेविका वर्षा तापकीर, नगरसेविका ज्योती गोसावी, उद्योजक तुषार गोसावी, उद्योजक जवाहर चोरगे, मुख्याध्यापिका अनुराधा निकम, वारकरी आचारसंहिता परिषदेचे मुख्य प्रवर्तक निलेश महाराज झरेकर, संयोजक व पद्मा फाउंडेशनचे अध्यक्ष शशिकांत कांबळे आदी उपस्थित होते.

## हा माझ्या करिअरमधील सर्वांत आव्हानात्मक आणि अविस्मरणीय अनुभव होता - आयुषी खुराणा

(स. गांवकरी)

झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिका 'जाने अनजाने हम मिले'मध्ये भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या प्रमुख भूमिका असून आपल्या रोचक कथानक आणि भावनिक नाट्यामुळे ह्या मालिकेने प्रेक्षकांना सतत गुंतवून ठेवले आहे. काळाच्या ओघात या मालिकेने कलाकारांना भावनिकदृष्ट्या आव्हान देणारे अनेक प्रभावी ट्रॅक्स दिले आहेत, मग तो सहज राजपूत (उन्नती) चा घरगुती हिंसाचाराचा ट्रॅक असो किंवा भरत अहलावत (राघव) चे तुरुंगाचे दृश्य. या प्रभावी क्षणांनी केवळ कलाकारांची कसोटी पाहिली नाही तर ती दृश्ये प्रेक्षकांनाही आपलीशी वाटली आणि ती मालिकेमधील काही सर्वांत संस्मरणीय दृश्ये ठरली. आगामी भागांमध्ये प्रेक्षकांना आणखी एक हृदयद्रावक अध्याय पाहायला मिळणार आहे जेव्हा रीत



बाळाला जन्म देते, पण तिला लगेचच तिच्या नवजात बाळाच्या दुःखद निधनाला सामोरे जावे लागते. या शोकांतिकेला तोंड देऊ न शकल्याने रीत आपल्या बाळाच्या समाधीवर जाताना भावनिकरीत्या कोसळते. आयुषी खुराणा सांगते की पडद्यावर आईच्या दुःखाचे चित्रण करणे अत्यंत आव्हानात्मक होते, मात्र सहकलाकारांचा आणि संपूर्ण टीमचा सातत्यपूर्ण पाठिंबा मिळाल्यामुळे त्या गहन क्षणांना तिला प्रामाणिकपणे आणि ठामपणे साकारता आले. ही भावनिक दृश्ये साकारण्याबद्दल आयुषी खुराणा म्हणाली, "अलीकडील भागांमधील रीतचा प्रवास हा माझ्या करिअरमधील भावनिकदृष्ट्या सर्वांत आव्हानात्मक अनुभवांपैकी एक ठरला आहे. मी प्रत्यक्ष आयुष्यात आई नाही, पण नवजात बाळ गमावणाऱ्या स्त्रीच्या भूमिकेत जाणे हे कल्पनेतही हृदयद्रावक होते. विशेषतः जेव्हा रीत आपल्या बाळाच्या समाधीवर कोसळते, तेव्हा मला पात्राच्या वेदनेत पूर्णपणे झोकून द्यावे लागले आणि त्यामुळे मी खूप भावुक झाले. कलाकार म्हणून आपण अनेकदा आपल्या भावनांमधून ताकद घेतो, पण बाळ गमावण्याचे दुःख साकारताना ते कॅमेऱ्याच्या पलीकडेही मनात राहते. काही दृश्यांनी मला खरोखरच नि:शब्द केले. इतके सहकार्यपूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी माझे सहकलाकार, दिग्दर्शक आणि संपूर्ण टीमची मी आभारी आहे, ज्यांनी मला हे कठीण क्षण प्रामाणिकपणे व संवेदनशीलतेने साकारण्यासाठी पुरेशी संधी दिली." आता रीत आणि राघव आपल्या मुलाच्या निधनाच्या अकल्पनीय वेदनेला सामोरे जात आहेत, त्यामुळे ह्या शोकांतिकेचा त्यांच्या नात्यावर कसा परिणाम होईल याची उत्सुकता प्रेक्षकांना लागली आहे. जरी या जोडप्याने आतापर्यंत आयुष्याने दिलेल्या प्रत्येक आव्हानानंतर पुन्हा एकमेकांकडे परतण्याचा मार्ग शोधला असला, तरी हा दुःखद धक्का त्यांच्या आयुष्यातील सर्वांत वेगळा आणि कठीण आहे. रीत आणि राघव या भावनिक वादळातून एकत्र मार्ग काढून अधिक मजबूत जोडपे म्हणून पुढे येतील का की हे दुःख त्यांना एकमेकांपासून दूर नेईल? आगामी भाग प्रेक्षकांसाठी भावनिक आणि प्रभावी प्रवासाची हमी देतात.

## 'कूस' सर्वोत्कृष्ट; अमेरिका, फ्रान्समध्येही मराठी लघुपटाचा झेंडा

डॉ. ज्ञानेश्वर जाधवर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक; अनुया कळसकर यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार; ऊसतोड मजूर महिलांचे जीवन, गर्भाशय काढण्यावर प्रकाश

पुणे : (स. गांवकरी)

प्रभात चित्र मंडळ, रोटरी क्लब ऑफ ठाणे एसेस आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'चित्रभारती २०२६' लघुपट महोत्सवात डॉ. ज्ञानेश्वर जाधवर दिग्दर्शित 'कूस' (द वूम्ब) या लघुपटाने सर्वोत्कृष्ट लघुपटाचा मान पटकावला. याचबरोबर डॉ. जाधवर यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार, तर अभिनेत्री अनुया कळसकर यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्काराने गौरविण्यात आले. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पार पडलेल्या महोत्सवानंतर ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे खासदार नरेश म्हस्के, प्रभात चित्र मंडळाचे सचिव डॉ. संतोष पाठारे आणि अन्य मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.



बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिलांचे श्रमजीवन, आरोग्यविषयक समस्या, मासिक पाळीशी संबंधित अडचणी आणि वाढत्या गर्भाशय काढण्याच्या घटनांचे वास्तववादी चित्रण 'कूस' या लघुपटातून करण्यात आले आहे. उचित मीडिया सर्व्हिसेस, पुणे निर्मित या लघुपटाचे निर्माते जीवराज महादेव चोले असून, कथा, पटकथा आणि दिग्दर्शन डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांचे आहे, तर संवाद लेखनासाठी विठ्ठल काळे यांनी साथ केली आहे. या लघुपटात अनुया कळसकर, विठ्ठल नागनाथ काळे, वैशाली केंदळे, डॉ. सोनाली घाटणेकर, अनिल कांबळे आणि जीवराज महादेव चोले यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. तर अरमान सय्यद आणि जानवी मोरे यांनी बालकलाकार म्हणून काम केले आहे. राष्ट्रीय स्तरावरील यशाबरोबरच 'कूस'ने आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपली छाप पाडली आहे. अमेरिकेतील न्यू जर्सी येथे झालेल्या पाचव्या मराठी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (मिफ २०२६) अनुया कळसकर यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार मिळाला. तसेच 'कूस'ची निवड फ्रान्समधील प्रतिष्ठित क्लेरमाँ-फेराँ शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल मार्केट २०२६ मध्ये अधिकृतरीत्या झाली होती. याशिवाय 'कूस'ने कान्स शॉर्ट फिल्म कॉर्नर मार्केटमध्येही सहभाग नोंदविला. जगातील महत्त्वाच्या लघुपट महोत्सवांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या व्यासपीठांवर स्थान मिळाल्याने मराठी चित्रपटसृष्टीच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. 'कूस'ने यापूर्वीही अनेक प्रतिष्ठित पुरस्कार पटकावले आहेत. सहाव्या मुंबा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील स्पेशल ज्युरी मेंशन अवॉर्ड, आठव्या अण्णाभाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातील सर्वोत्कृष्ट अभिनेता (विठ्ठल काळे) पुरस्कार, १९व्या प्रतिबिंब फिल्म फेस्टिव्हलमधील सर्वोत्कृष्ट पटकथा, दिग्दर्शन आणि ध्वनी संकल्पना पुरस्कार, तसेच पुणे पेशवा फिल्म फेस्टिव्हल २०२६ मधील तृतीय पुरस्कार, सर्वोत्तम पटकथा आणि सर्वोत्तम अभिनेता पुरस्कारांचा त्यामध्ये समावेश आहे.

## मेटाने भारतात एआय-सक्षम डेटा सेंटरसाठी रिलायन्ससोबत सहयोग केला

मुंबई : (स. गांवकरी)

मेटा आणि रिलायन्स इंडस्ट्रीजने आज भारतातील एआय-सक्षम डेटा सेंटरच्या करारासह आमच्या धोरणात्मक सहयोगाच्या महत्त्वपूर्ण विस्ताराची घोषणा केली. जामनगर, गुजरात येथे असलेली ही गुंतवणूक भारतातील मेटाच्या दृढ कटिबद्धतेला सादर करते, जी जागतिक स्तरावर आमच्या सर्वात मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या समुदायाला वैयक्तिक सुपरइंटेलिजन्स प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेली उत्पादने आणि एआय क्षमतांना सक्षम करणारी पायाभूत सुविधा आणेल. या कराराचा भाग म्हणून, रिलायन्स १६८ मेगावॅट क्षमतेचे डेटा सेंटर उभारणार आहे, जे मेटा भाड्याने घेईल आणि भविष्यात ते वाढवण्याचे पर्यायही उपलब्ध असतील. "भारतातील आमचे पहिले एआय-सक्षम डेटा सेंटर उभारण्यासाठी रिलायन्ससोबत काम करण्याचा आम्हाला अभिमान आहे. जामनगरमधील ही जागतिक दर्जाची सुविधा आम्हाला जागतिक स्तरावर आमच्या एआय पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यास मदत करेल आणि त्याच वेळी भारताच्या अर्थव्यवस्थेतील आमची दीर्घकालीन गुंतवणूक अधिक दृढ करेल," असे मेटाचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) मार्क झुकरबर्ग म्हणाले. जगभरातील अब्जावधी व्यक्तींना सेवा देणाऱ्या आमच्या तंत्रज्ञान, सेवा आणि एआय महत्त्वाकांक्षांना पाठिंबा देण्यासाठी मेटा आपल्या क्षमतांचा विस्तार करण्यासाठी आक्रमकपणे गुंतवणूक करत आहे. भारताची वेगाने वाढणारी तंत्रज्ञान-केंद्रित डिजिटल अर्थव्यवस्था, व्यापक ग्राहक संख्या आणि रिलायन्ससोबत आमच्या सहयोगाची ताकद यामुळे भारत गुंतवणुकीसाठी आदर्श ठिकाण बनले आहे.

# डिलिव्हरी पार्टनर्ससाठी फ्लिपकार्ट तर्फे ईव्ही असिस्टची सुरुवात

पुणे : (स. गांवकरी)

फ्लिपकार्ट या भारतील स्वदेशी अशा ई कॉमर्स मार्केटप्लेस ने नुकतीच ईव्ही असिस्ट ही त्यांचे डिलिव्हरी एक्झिक्युटिव्ह्ज असलेल्या विशमास्टर्स साठी विशेष रुपाने त्यांची इलेक्ट्रिक वाहने (इव्हीज) ची उपलब्धता वाढवणारी सुविधा सुरु केली आहे. सध्या ही सुविधा २० हून अधिक शहरांतील फ्लिपकार्ट मिनिट्स च्या रायडर्स साठी उपलब्ध असून ही सुरुवात म्हणजे फ्लिपकार्टच्या ईव्ही १०० या लास्ट माईल डिलिव्हरी वाहनांना इलेक्ट्रिक वाहनांमध्ये परावर्तित करण्याच्या योजनेचा एक भाग आहे. फ्लिपकार्टच्या ईव्ही वाहनांमध्ये गेल्या वर्षभरात दुप्पट वाढ होऊन २०२५ च्या सणासूदीच्या दिवसात त्यांनी २० हजार वाहनांचा टप्पा पार केला आहे. भारत जसजसा




वेगाने इलेक्ट्रिक वाहनांचा प्रचार करत असतांना इव्ही असिस्ट मुळे हा बदल अधिक सकारात्मक आणि डिलिव्हरी पार्टनर्स साठी अधिक चांगला होणार आहे. आपल्या तंत्रज्ञानातील क्षमतांचा वापर करुन फ्लिपकार्ट विश्वसनीय अशा इव्ही वाहनांसह भाडे सेवा प्रदात्यांना एकाच मंचावर ईव्ही असिस्टच्या माध्यमातून आणत आहे. या उपक्रमामुळे डिलिव्हरी पार्टनर्स ना सर्वसाधारणपणे ईव्हीची निवड करण्यासाठी येणाऱ्या समस्या जसे परवडणारे दर, वाहनाची मालकी आणि भाडेतत्वावर वाहने घेण्याचा पर्याय उपलब्ध होणार आहे. सुरुवात केल्यापासून भारतातील विशमास्टर्स ने सुध्दा अधिक प्रमाणात रस दखवला आहे, दिल्ली एनसीआर, पाटणा आणि बंगळुरु मध्ये सर्वाधिक वापर होत असून यातून संपूर्ण भारतात लास्ट माईल डिलिव्हरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये ईव्ही उपायांची अधिक मागणी दिसून आली आहे. फ्लिपाकर्टने नुकताच आपल्या ६००० डिलिव्हरी पार्टनर्स बरोबर एक अभ्यास हाती घेतला होता, यांतील ४० टक्के भागीदार हे इलेक्ट्रिक मोबिलिटी कडे वळण्यास उत्सुक आहेत, पण वित्तपुरवठ्याची उपलब्धता, चार्जिंग सुविधा आणि इको सिस्टम वरील विश्वास या प्राथमिक समस्या ठरल्या. या अभ्यासातून असे समोर आले की सर्वेक्षण केलेल्यांपैकी ९० टक्के डिलिव्हरी पार्टनर्स हे दरमहा २००० रुपये ते ५००० रुपयांपर्यंत खर्च हा पेट्रोलवर करत असतात. त्याच वेळी बाजारपेठेचा अंदाज असे सांगतो की इलेक्ट्रिकच्या दुचाकींच्या वापरामुळे इंधनावरील खर्चात ७०-८० टक्क्यांपर्यंत बचत होते, तर देखभाल खर्चात १५-२० टक्क्यांपर्यंत बचत होऊन पार्टनर्सच्या उत्पादनात वाढ होते. इव्ही असिस्ट च्या माध्यमातून विशमास्टर्स हे त्यांच्या शहरानुसार विविध प्रकारच्या इलेक्ट्रिक दुचाकी भाड्याने कुठे उपलब्ध आहेत त्यानुसार आणि त्यांच्या बजेट नुसार ही माहिती मिळवू शकतात. ते अगदी आठवड्याला १००० रुपयांपासून ते २००० रुपयांपर्यंतच्या दुचाकींच्या बजेटनुसार उपलब्ध पर्याय पडताळून त्यानुसार त्यांचे केवळ नाव आणि मोबाईल नंबर देऊन इच्छा व्यक्त करुन मोबिलिटी सेवा प्रदात्यांशी जोडले जाऊन वाहन प्राप्त करु शकतील. मोबिलिटी पार्टनर्स कडून वाहनाची देखभाल, सेवा आणि कार्यात्मक सहकार्य दिले जाते ज्यामुळे डिलिव्हरी पार्टनर्स ची वाहनाची मालकी सोपी होऊन रोजच्या कटकटींपासून मुक्ती मिळते. या इव्हीजचे डिझाईन हे हाय फ्रिक्वेन्सी डिलिव्हरी सायकल्स नुसार करण्यात आली असून या गतीच्या नियमांनुसार आणि सुरक्षा उपकरणांसह युक्त असतात. एकात्मिक स्मार्ट तंत्रज्ञाना मध्ये आयओटी, जीपीएस ट्रॅकिंग आणि जिओफेन्सिंग मुळे सातत्याने ॲसेट मॉनिटरींग आणि चोरी पासूनही सुरक्षा प्राप्त होते. विविध भौगोलिक स्थानांवरील उपलब्धता वाढवण्यासाठी हा मंच विविध भाषांमध्ये सुरु करण्यात येत असून यामध्ये इंग्रजी, हिंदी, बंगाली आणि कन्नड या भाषांचा समावेश करण्यात आला आहे. या सुरुवाती विषयी बोलतांना फ्लिपकार्ट ग्रुप चे चीफ कॉर्पोरेट अफेअर्स ऑफिसर रजनीश कुमार यांनी सांगितले " "भारताचा इलेक्ट्रिक मोबिलिटीकडे होणारा बदल शेवटी यावर अवलंबून असेल की आपण लाखो लोकांसाठी त्याचा स्वीकार किती सोपा आणि परवडणारा बनवतो. देशातील सर्वात मोठ्या लास्ट-माईल डिलिव्हरी नेटवर्कपैकी एक असलेल्या फ्लिपकार्टकडे या बदलाला पाठबळ देण्याची योग्य क्षमता असून त्याला अर्थपूर्णरीत्या पाठिंबा देणे म्हणजे ईव्हीचा स्वीकार व्यवहार्य आणि सुलभ करणाऱ्या तळागाळातील प्रणाली उभारणे होय.